दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे



✻ (आष्टी) वर्धा ✻ शुक्रवार, दि.१८ एप्रिल २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १८१ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

विदर्भाला विकसित करून मुख्य प्रवाहात आणणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पायलट प्रशिक्षण केंद्रामुळे अमरावती जागतिक नकाशावर;विमानतळामुळे अमरावतीला मिळणार नवी ओळख

वृत्तसंस्था ■ अमरावती



अमरावती : स्टेट ऑफ आर्ट असलेल्या अमरावती विमानतळ आणि पायलट प्रशिक्षण केंद्रामुळे अमरावतीला विशेष ओळख प्राप्त होणार आहे. येत्या काळात सिंचन, पायाभूत सुविधा यासोबतच सर्वसामान्य नागरिकांसाठी वेगवान प्रवासाच्या सुविधा निर्माण करण्यात येतील. विदर्भातील विकासात्मक कामे पूर्ण करून या भागाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम प्राधान्याने केले जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

अमरावती विमानतळाचे उद्घाटन, तसेच प्रवाशी विमानसेवेचा शुभारंभ आणि एअर इंडिया पायलट प्रशिक्षण केंद्राच्या उड्डाणाचे प्रात्यक्षिक आज पार पडले. यावेळी केंद्रीय विमान वाहतूक मंत्री किंजरापू राम मोहन नायडू, केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कामगार मंत्री आकाश फुंडकर, अनुसुचित जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ, खासदार डॉ. अनिल बोंडे, बळवंत वानखडे, अमर काळे, आमदार संजय खोडके, डॉ. संजय कुटे, रवी राणा, सुलभा खोडके, प्रतापदादा अडसड, केवलराम काळे, राजेश वानखडे, प्रविण तायडे, उमेश यावलकर, गजानन लवटे, नवनीत राणा, परिवहन व बंदरे विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लिमिटेडच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्याच्या विकासासाठी करण्यात येणाऱ्या करारामध्ये विदर्भाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. यामुळे विदर्भाचे चित्र बदलले आहेत. समृद्धी महामार्ग जेएनपीटी आणि वाढवण बंदराला जोडण्यात येणार आहे. यासोबतच वैनगंगा-नळगंगा प्रकल्पात विदर्भातील सात जिल्ह्यांचा समावेश राहणार आहे. यातून दहा लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असून शेतकऱ्यांना चांगल्या पद्धतीने शेती करता येणे शक्य होणार आहे. प्रकल्पामुळे या भागाचा चेहरामोहरा बदलणार आहे. हा प्रकल्प वेळेत पूर्ण करून विदर्भातील दुष्काळ कायमचा संपविण्यात येणार आहे. सिंचनाने कोरडवाहू शेती बागायती करण्यात येणार आहे. तसेच सहा हजार कोटी रुपये खर्च करून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबविण्यात येणार आहे.

विदर्भाच्या दृष्टिकोनातून अमरावती हे महत्त्वाचे स्थान आहे. या ठिकाणी पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर देण्यात येत आहे. विमानतळामुळे आर्थिक क्रांती होणार असून या भागाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लाभ होणार आहे. तसेच रोजगाराच्या विविध संधी निर्माण होतील. विमानतळामुळे परिसराला नवी ओळख निर्माण होणार आहे. उद्योजकही विमानतळ असणाऱ्या भागाला प्राधान्य देऊन उद्योग उभारत असल्याने येथील टेक्सटाईल उद्योगाला चालना मिळेल. या ठिकाणी होऊ घातलेल्या पीएम मित्रा पार्कमुळे दोन लाख रोजगार निर्माण होणार असून कापूस ते कापड आणि पुढे फॅशनमुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना लाभ होणार आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

आज या ठिकाणी विमानाचे पहिले उड्डाण होत असून भविष्यात रात्री विमान उतरण्याची सोय करण्यात येईल. यासोबतच नवी मुंबई विमानतळ सुरू झाल्यानंतर सकाळच्या सत्रातील विमान उड्डाणाची वेळ प्राधान्याने ठरविण्यात येईल. या ठिकाणी दक्षिण आशियामधील सर्वात मोठे पायलट प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येणार आहे. यात एका वर्षात १८० पायलट तयार होतील. त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी ३४ विमाने उपलब्ध असतील. भविष्यात विमानतळाचे विस्तारीकरण करण्यात येणार असून लवकरच पूर्ण क्षमतेने विमानतळ सुरू होईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

केंद्रीय मंत्री नायडू म्हणाले, विचार आणि कर्तृत्ववाने महाराष्ट्राच्या भूमीने संकल्पना आणि समर्पणाचा वारसा जपला आहे. अमरावती विमानतळामुळे या भागाच्या विकासाचा पाया रचला गेला आहे. राज्यात दूरदर्शी नेतृत्व असल्याने याचा लाभ जनतेला होत आहे. तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेमध्ये सांगितलेला मानवसेवेचा वसा सरकार जपत आहे. देशाच्या विकासात हवाई क्षेत्राचे योगदान महत्त्वाचे आहे. गेल्या काळात प्रवासी विमानसेवेत ४० टक्के वाढ झाली आहे. देशातील १६० विमानतळांपैकी १०५ विमानतळ सुरू झाली आहेत. तसेच दहा वर्षात १५९ असलेल्या फ्लाईटची संख्या ४०० वर नेण्यात आली आहे. तसेच मुंबई विमानतळ हे प्रमुख झाले आहे. त्याला पूरक म्हणून नवी मुंबई विमानतळ सुरू करण्यात येणार आहे. विमानतळासोबतच कार्गो, विमान दुरुस्ती आणि प्रशिक्षण केंद्र आदी सुरू होणे गरजेचे आहे. यामुळे या भागात रोजगार निर्मितीसोबतच उद्योग उभारणीही होईल. विमानतळ क्षेत्राचा विकास होताना तो पर्यावरणपूरक, जल पुनर्भरण आणि सौर उर्जेवर आधारित करण्यावर भर देण्यात येत असल्याचे सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी, अमरावती येथील विमानतळ विक्रमी वेळेत पूर्ण केल्याबद्दल अभिनंदन केले. राज्यात समृद्धी मार्ग, कोस्टल रोड, अटल सेतू, नवी मुंबई एअरपोर्ट, वाढवण बंदरासोबतच रायगड येथेही बंदर उभारणी करण्यात येणार आहे. राज्यात प्रामुख्याने पायाभूत सुविधांवर भर देण्यात येणार असून राज्याच्या विकासाला गती देण्यात येणार आहे. अमरावती येथील विमानतळ हा एक गेम चेंजर प्रकल्प ठरणार आहे. राज्य शासनाने महिला, शेतकरी, युवक यांच्यासाठी सुरू केलेल्या योजना यापुढेही सुरू राहतील, असे सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी विमानतळ हे या भागाच्या विकासाला नवे पंख देणारा टप्पा आहे. राज्य मागे राहू नये यासाठी सुविधांवर भर देण्यात येत आहे. यात प्रामुख्याने पाण्याचा प्रश्न, पायाभूत सुविधा आणि महामार्गाच्या निर्मितीवर भर देण्यात येते आहे. आजच्या घडीला सर्वात जास्त विमानतळ महाराष्ट्रात आहे. येत्या काळात अकोला येथील विमानतळाच्या जागेचाही प्रश्न मार्गी लावून विमानतळ कार्यान्वित करण्यात येईल. विमानतळाचे जाळे निर्माण करून आपत्कालीन परिस्थितीत तातडीने पोचता येईल, यासाठी प्रयत्न करण्यात येतील. अमरावती येथील टेक्सटाईल पार्क पीएम मित्रामधून निर्यातक्षम उत्पादन होणार आहे. यामुळे निर्यातीला चालना मिळणार आहे. अमरावती विमानतळावरून सेवा देणाऱ्या कंपनीने अखंड सेवा द्यावी. काही अडचणी आल्यास पर्यायी व्यवस्था द्यावी, अन्यथा प्रवाशांना पूर्ण रक्कम परत द्यावी. तसेच सकाळच्या सत्रात फ्लाईटची सुविधा करून देण्यात यावी असे निर्देश दिले.

केंद्रीय विमान वाहतुक राज्यमंत्री श्री. मोहोळ यांनी पश्चिम विदर्भातील महत्त्वाचे स्थान असलेल्या अमरावती येथून विमान सेवा सुरू होणे ही विमान वाहतूक क्षेत्रातील क्रांती असल्याचे सांगून देशातील आज असलेल्या १६० विमानतळाच्या संख्येत ८६ ने भर पडणार आहे. गेल्या काळात प्रवासी संख्या दुप्पट झाली असून येत्या काळात नवीन अकराशे विमाने विकत घेण्यात येणार आहेत. परिणामी देश विमान वाहतुकीमध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहे. यामुळे २०४७ मध्ये विकसित भारताचे उद्दिष्ट पूर्ण होण्यास मदत होईल. येत्या काळात विमानतळ विस्तारीकरणाची कामे हाती घेऊन भरीव कामे करण्यात येईल. ही कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी परिपूर्ण प्रयत्न करण्यात येतील, असेही ते म्हणाले.

महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी विमानतळावरून पहिल्यांदा प्रवास करणारे ऋषिकेश गव्हाणे, अनवर अली, आसिफ इकबाल या प्रवाशांना प्रातिनिधीक स्वरूपात बोर्डिंग पासचे वितरण करण्यात आले. अमरावती विमानतळावर आलेल्या पहिल्या प्रवासी विमानाचे वॉटर कॅननने स्वागत करण्यात आले. त्यानंतर पायलट प्रशिक्षण केंद्राच्या डेमो फ्लाईटचे प्रात्यक्षिक करण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस आणि मान्यवरांनी विमानतळाच्या कोनशिलेचे अनावरण केले. माजी आमदार प्रवीण पोटे आणि बेलोराच्या सरपंच माधुरी चौधरी यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचा सत्कार केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक, शैक्षणिक विचार तरुणांपर्यंत पोहोचविणे महत्त्वाचे

: सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ



इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्याकडून पाहणी

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाने तरुणांमध्ये एक वेगळी ऊर्जा निर्माण होते. त्यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे निर्देश राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची प्रत्यक्ष पाहणी केली आणि कामकाजाचा आढावा घेतला. चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिस्थळाला भेट देऊन त्यांना वंदन केले.

यावेळी आमदार भाई गिरकर, सहसचिव सोमनाथ बागुल, सह आयुक्त प्रसाद खैरनार, कार्यकारी अभियंता प्रदीप अहिरे, नगरसेविका समिता कांबळे, माजी नगरसेवक शरद कांबळे, राहुल कांबळे, अशोक कांबळे आदीसह, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई महानगरपालिका, सामाजिक न्याय विभागाचे अधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

राज्यमंत्री श्रीमती मिसाळ म्हणाल्या की, स्मारकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शैक्षणिक आणि सामाजिक इतिहास प्रभावीपणे मांडण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञान, ऑडिओ-विज्युअल माध्यमे, इंटरेक्टिव्ह डिस्प्ले, लेझर शो इत्यादी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. जगातील आणि देशातील विविध स्मारकाचा अभ्यास करून आपला इतिहास आंतरराष्ट्रीय पर्यटकांपर्यंत कसा पोहोचवता येईल यासाठी नियोजन करावे.

तसेच, स्मारकाच्या मार्गिका, स्वच्छता व सुरक्षा व्यवस्था यावरही लक्ष देण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. कामांची गुणवत्ता राखत, इलेक्ट्रॉनिक कामे समांतरपणे (फेजनुसार) सुरू ठेवावी जेणेकरून स्मारक लवकरात लवकर पूर्ण होऊ शकेल, असेही त्यांनी सांगितले. स्मारकात उभारण्यात येणाऱ्या व्याख्यानगृह, ग्रंथालय, सभागृह, विपश्यना केंद्र अशा विविध सभागृहात स्वच्छता आणि सुरक्षा यास प्राधान्य देण्याच्या दृष्टीने नियोजन करावे. सचिवांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीमध्ये देखभाल दुरुस्तीसाठींच्या उपाययोजनांबाबत निर्णय घ्यावेत अशा सूचनाही राज्यमंत्री श्रीमती मिसाळ यांनी दिल्या. यावेळी समितीतील सदस्य, कार्यकारी अभियंते आणि संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून त्यांनी कामाची सद्यस्थिती जाणून घेतली व आवश्यक त्या सुधारणा सुचवल्या.

म्हसळा तालुक्यातील सरवर येथे युनानी महाविद्यालय उभारण्यात यावे : वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यातील सावर येथे युनानी महाविद्यालय उभारण्यास मान्यता देण्यात आली होती. परंतु या जागेत क्रीडा संकुल इमारतीचे बांधकाम झाले असल्याने ही जागा महाविद्यालय उभारणीसाठी पुरेशी नाही. त्यामुळे सरवर येथे महाविद्यालय उभारण्यात यावे, अशा सूचना वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिल्या.

मंत्रालयात युनानी वैद्यकीय महाविद्यालय, म्हसळा जि. रायगड येथील अडचणीबाबत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे संचालक अजय चंदनवाले, आयुष संचालनालयाचे संचालक रमण घोंगळारकर उपस्थित होते.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, तात्पुरत्या स्वरूपात शासकीय रिकाम्या इमारतीत किंवा भाडेतत्त्वावरील जागेत महाविद्यालय सुरु करण्यात यावे. तसेच वैद्यकीय महाविद्यालयासाठी आवश्यक प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी. सरवर येथील जागा महसूल विभागाने सुचविली असून त्यास महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी सहमती दर्शविली.

कोयना धरणाच्या जलाशयाचे नाव बदलण्याचा प्रस्ताव सादर करा : जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : कोयना धरणाच्या जलाशयाचे नाव छत्रपती शिवाजी महाराज कोयना जलसागर करण्याबाबत, कोयना धरण परिसर सुशोभिकरण, जलाशय परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणे याबाबतचा सर्वसमावेशक प्रस्ताव शासनास सादर करावा, अशा सूचना जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महाकंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिल्या.

कोयना प्रकल्प विभागाच्या स्थानिक प्रश्नांबाबत उपाययोजना करण्यासंदर्भात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता हणमंत गुणाले, अ. ह. धुमाळ यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे आपले दैवत आहे. कोयना धरण हे महत्त्वाचे धरण असल्याने या धारणाच्या जलाशयाला छत्रपती शिवाजी महाराज कोयना जलसागर असे नाव दिल्यास राज्यातील प्रत्येक नागरिकास याचा अभिमान वाटेल, त्यामुळे याबाबतचा प्रस्ताव तातडीने सादर करावा. तसेच हुंबरळी पाझर तलावासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन दिला जाईल. या पाझर तलावासाठी सुधारित प्रशासकीय मान्यतोसाठीचा प्रस्ताव तातडीने सादर करावा. कोयना धरण पायथा (डावा तीर) विद्युत गृहाबाबत योग्य निर्णय घेतला जाईल. कोयना परिसरातील नेताजी सुभाषचंद्र हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या थकीत भाड्याबाबत संबंधित संस्थेने कार्यकारी मंडळाची बैठक घ्यावी. त्यानंतर याबाबत निर्णय घेतला जाईल. कोयनानगर ता. पाटण येथील व्यापाऱ्यांच्या समस्येबाबतही सकारात्मक विचार केला जाईल. तसेच पूर नियंत्रणाबाबतही जलसंपदा विभागाने आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना मंत्री श्री.विखे-पाटील यांनी दिल्या.

या बैठकीत उरमोडी धरण प्रकल्पासंदर्भातील विषयांवर चर्चा करण्यात आली. ज्या पुनर्वसित वसाहतींचे गावठाण अद्यापि तयार नाही त्यांना उदरनिर्वाह भत्ता सुरु ठेवण्यात यावा. तसेच गावठाण तयार करणेबाबतचा निर्णय तातडीने घ्यावा अशा सूचना जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी दिल्या.

मेट्रो मार्ग ७ अ मधील भुयारी बोगद्याचे 'ब्रेक थ्रू' यशस्वीरित्या पूर्ण: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (टी २) ते अंधेरी पूर्व या मेट्रो मार्ग ७ अ मधील १.६५ किलोमीटर लांबीच्या भुयारी बोगद्याचे 'ब्रेक थ्रू' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले. यावेळी कौशल, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार पराग अळवणी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त संजय मुखर्जी, अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवातीला संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रकल्पाविषयी माहिती जाणून घेतली. तसेच कळ दाबून 'ब्रेक थ्रू' कामाला सुरुवात केली. यानंतर या कामाची पाहणी केली. हा भुयारी बोगदा मेट्रो ७ अ वर डाऊनलाईन वर आहे. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ स्टेशन ते एअरपोर्ट कॉलनी स्टेशन दरम्यान हा बोगदा असणार आहे. ही मेट्रो जोडणे मुंबई महानगर प्रदेशातील एकूण मेट्रो जाळ्यासाठी महत्त्वाचा टप्पा असणार आहे. या मेट्रो मार्गामुळे मुंबई महानगर क्षेत्रातील मीरा-भाईंदर व पुढे वसई - विरार हा भाग छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळासोबत मेट्रोने जोडले जातील. तसेच ठाणे व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुद्धा मेट्रो ने जोडण्यात येईल. या मेट्रो मार्गाचे ५९ टक्के काम पूर्ण झाले आहे.

मेट्रो मार्ग ७ अ विषयी..

या मेट्रो मार्गाची लांबी ३.४ किलोमीटर असून त्यापैकी उन्नत मार्ग ०.९४ किलोमीटर आणि भूमिगत २.५० किलोमीटर आहे. या मार्गावर दोन स्थानके असणार आहेत. एक स्थानक उन्नत मार्गावर एअरपोर्ट कॉलनी तर दुसरे स्थानक भूमिगत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे असणार आहे. उन्नत मेट्रो मार्ग ०.५७ किलोमीटर असेल दुहेरी बोगद्याची लांबी २.०३५ किलोमीटर आहे. १ सप्टेंबर २०२३ रोजी डाउनलाईन बोगद्याचे पहिले ड्राईव्ह सुरू झाले. या बोगद्याची लांबी १.६५ किलोमीटर असून लाइनिंगसाठी ११८० रिंग्स बसविण्यात आल्या आहेत. बोगद्याचा व्यास ६.३५ मीटर एवढा असून सहा भागात विशेष डिझाईन असलेल्या प्रिकास्ट रिंग वापरण्यात आल्या आहेत.

सप्टेंबर २०२३ मध्ये टीबीएम मशीन जमिनीपासून ३० मीटर खाली भूगर्भात उतरवण्यात आली. मेट्रो मार्ग तीनच्या वरून, सहार उन्नत रस्त्यांच्या पायाखालून, मोठ्या सांडपाणी वाहिन्या व जलवाहिन्यांना क्रॉस करून विविध अडचणींवर मात करून या बोगद्याचा ब्रेक थ्रू पूर्ण करण्यात आला. या मेट्रो मार्गामुळे मुंबईकरांना कुलाबा ते वसई विरार, मीरा भाईंदर पर्यंत आरामदायी प्रवास अनुभवता येणार आहे.

या मार्गामुळे मुंबई महानगर प्रदेशातील विविध मेट्रोमार्ग थेट विमानतळापर्यंत मेट्रोने जोडले जातील. मेट्रोमार्ग ३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) च्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ या भूमिगत स्थानक मार्गासोबत सुलभ संलग्न करणे शक्य होईल. प्रवाशांसाठी सुरक्षित आरामदायी व सुलभ प्रवास शक्य होणार आहे. दाटीवाटीच्या नागरी परिसरातून मेट्रोसाठी उन्नत व भूमिगत मार्गाची रचना केल्यामुळे विमानतळ परिसरात मेट्रो बांधकामासाठी कमी जागा व्यापली जाणार आहे.

माजलगावमधील वीज, रस्ते,आरोग्य विषयीचे समस्या गांभीर्याने घ्या : राज्यमंत्री मेघना साकोरे- बोर्डीकर

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : माजलगाव व माजलगाव विधानसभा मतदारसंघातील वीज, रस्ते आणि आरोग्य विषयीच्या समस्या गांभीर्याने घेऊन तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात अशा सूचना सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण पाणीपुरवठा स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिल्या.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ होल्डिंग कंपनीच्या मुख्य कार्यालयात माजलगाव विधानसभा मतदारसंघातील विविध समस्यांबाबत आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे सदस्य प्रकाश सोळंके, महावितरणचे संचालक अरविंद भादीकर, महावितरणचे प्रकल्प संचालक प्रसाद रेशमे, एम एस आर डी सीचे कार्यकारी अभियंता सुनिता वनवे, अधीक्षक अभियंता सतीश साबणे, उपअभियंता अतुल कोटेच्या उपस्थित होते.

राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या, माजलगाव परिसरात ग्राहकांना दर्जेदार आणि अखंडित वीज पुरवठा मिळावा यासाठी ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढवणे, नवीन उपकेंद्रांची उभारणी, जीर्ण झालेल्या वीजवाहिन्यांची पुनर्बांधणी करणे. आदी कामे समाधानकारक असून उर्वरित कामे गतीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

माजलगाव मतदारसंघातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे व ग्रामीण रुग्णालयातील सुविधा, औषध साठा, डॉक्टर व इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांची उपस्थिती याबाबत चर्चा करण्यात आली. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत माजलगाव ते कैज (जि. बीड) आणि माजलगाव ते परतुर (जि. जालना) या मार्गांवर राष्ट्रीय महामार्ग ५४८ (ए) अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या रस्ते विकास प्रकल्पाची सविस्तर माहिती सादर करण्यात आली. राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी सर्व विभागांनी समन्वय साधत कामांची गुणवत्ता राखून नियोजित वेळेत विकासकामे पूर्ण करावीत असे निर्देश दिले.

संपादकीय...

वो ख़्वाब देखते हैं...

भाषेचा संबंध असतो तो प्रांताशी; पण एखाद्या भाषेतले सांस्कृतिक सौंदर्य, भाषांमध्ये झालेली शब्दांची सरमिसळ, यांपैकी कशाचाच विचार न करता विरोध होतो कसा हा प्रश्न. 'भाषेचा व धर्माचा संबंध नाही' हे महाराष्ट्रातून झालेल्या उर्दू फलकविरोधी याचिकेवर सर्वोच्च न्यायालयालाच सांगावे लागले. सर्वोच्च न्यायालयाकडून आपणास काय काय ऐकून घ्यावे लागणार आहे; याचा अंदाज बांधणे अवघड. कारण आसपास आणि आसमंतातील अज्ञानवंतांची मांदियाळी. वास्तविक कायद्याचा अर्थ लावणे, संविधान रक्षा ही खरे तर सर्वोच्च न्यायालयाची जबाबदारी. तथापि अलीकडे या सर्वोच्च न्यायालयास शिंगे मोडून अनेकदा वासरांत शिरावे लागते. एखाद्या महामहोपाध्यायावर बाराखडी शिकवण्याची वेळ यावी; तसे हे. पण दोष न्यायालयाचा नाही. समाजकारण, राजकारण यास धर्मवादाचा खुराक मिळाला की मूर्खाचे नंदनवन बहरून येते त्यास सर्वोच्च न्यायालय तरी काय करणार? ताजा विषय महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपालिकेत लावला गेलेला उर्दू नामफलक. असा उर्दू भाषेतील फलक असणे हे शहरातील कुणा सुबुद्ध नागरिकास भावले नाही. या निर्णयास विरोध करणारी याचिका सदर नागरिकाने उच्च न्यायालयात दाखल केली आणि तेथे मुखभंग झाल्यावर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयानेही उर्दूत फलक लावण्यात काहीही गैर नसल्याचा निर्वाळा दिला. तो देताना सर्वोच्च न्यायालयाने समाज, धर्म, भाषा यांच्यातील परस्परसंबंधांबाबत काही मोलिक मार्गदर्शन केले. त्याचे मनःपूर्वक स्वागत. ते करताना भाषेस धर्माशी जोडू पाहणाऱ्या दिवसागणिक वाढणाऱ्या अर्धवटरावांचा समाचार घेणे आवश्यक ठरते. यास दोन अंगे आहेत. एक भाषिक आणि दुसरे सौंदर्यवादी सांस्कृतिक. उर्दू भाषा मुसलमानांची आणि हिंदी ही हिंदूंची असे हे नवधर्मपंडित मानतात. तेव्हा त्यास प्रश्न असा की: हिंदी ही भाषा नक्की कोणत्या हिंदूंची? तमिळनाडूतील? केरळमधील? पश्चिम बंगालातील? पंजाबातील? आसामातील? ओडिशातील? या राज्यांतील नागरिक हिंदू नाहीत काय? आणि असतील तर मग त्यांची भाषा ही हिंदी आहे असे म्हणता येईल काय? त्यातही उपप्रश्न असा की उर्दू ही भाषा मुसलमानांची असे समजा वादासाठी मान्य जरी केले तरी एक मुद्दा उरतोच. बंगाली मुसलमान वा केरळातील मोपले हे उर्दूत व्यवहार/लिखाण करतात की अनुक्रमे बंगाली व मल्याळम् भाषेत? बांगलादेश हा तर मुसलमानबहुल. मग त्या देशाची भाषा उर्दू आहे काय? त्या देशाचे राष्ट्रीय कवी म्हणून ओळखले जाणारे काझी नझरुल इस्लाम हे कोणत्या भाषेत लिहितात? त्यांनी बंगालीतच लिखाण केले, उर्दूत नाही. म्हणजे मग त्यांना मुसलमान मानायचे की नाही? या आणि अशा काही सर्वसाधारण प्रश्नांत एखादा शालेय विद्यार्थीही 'उर्दू-मुसलमान' जोडणी करणाऱ्यांस निरुत्तर करू शकेल. कारण भाषा ही प्रांताची असते, धर्माची नव्हे इतके सामान्य ज्ञानही या धर्मप्रेमींस नाही. तेव्हा प्रांत हे भाषेवरून ओळखले जातात. तमिळ बोलणारा तमिळनाडू, मराठी भाषकांचा महाराष्ट्र, कन्नडिगांचा कर्नाटक इत्यादी. यातील बहुतांश हे हिंदूच आहेत. पण हिंदी भाषक नाहीत. म्हणजे धर्म हा भाषा ठरवत असता तर ख्रिाश्चनबहुल सर्व युरोप एका भाषेत बोलता. तिकडे २७ युरोपीय देशांच्या किमान २७ भाषा तरी असतील. खुद्द ब्रिटनमध्येही वेल्श, स्कॉटिश आणि इंग्लिश भाषांचे संसार स्वतंत्र आहेत. पश्चिम आशियातील बहुतांश देश इस्लाम धर्मीय. त्या सर्व देशांत उर्दू बोलली जाते असे या नवधर्मरक्षकांस वाटते काय? सौदीचा उद्याचा राजा आणि आताचा राजपुत्र मोहम्मद बिन सलमान ऊर्फ 'एमबीएस' आपल्या तीर्थरूपांचे स्वागत 'आइये... तशरीफ लाइये...' अशा शब्दांत करतो असा या महाभागांचा समज असावा बहुधा. हे असे या विद्वानांस वाटू शकते कारण या मंडळींचा द्विराष्ट्रवादाचा सिद्धान्त फसला आणि भाषावार प्रांतरचनेस त्यांनी विरोध केला. मुसलमानांस त्यांच्या उर्दूसकट पाकिस्तान द्यायचे आणि मग उरलेल्या सर्व भारतातील हिंदूंनी हिंदीचा जयघोष करायचा अशी ही वाटणी. पाकिस्तान आकारास आल्यानंतरही भारतात मुसलमान आहेत आणि सर्व हिंदूदेखील हिंदीस आपले म्हणण्यास तयार नाहीत, अशी ही पंचाईत. दुसरा मुद्दा असा की एखादी भाषा अशी धर्माच्या गळ्यात मारून टाकली की भाषेतील सरमिसळीचे काय? की तांदळातून खडे निवडावेत तशी भाषेतील अन्य 'धर्मीय' शब्द वेगळे करायचे. मग 'पेशवे' यांचे काय करणार? 'शहा' राहणार की जाणार? आणि 'दफ्तर ? 'दुकान', 'बाजार', 'खुर्ची', 'जमीन', 'भाई', 'मुलाखत', 'जकात', 'दरम्यान' तसेच 'आमदार', 'खासदार' यांचे भवितव्य काय? ही भाषिक काडीमोड प्रत्यक्षात आल्यास यापुढे मराठीत 'आजारी' पडता येईल काय आणि बरे झाल्यावर पुन्हा 'गर्दीत जाता येईल काय? तसेच मराठीत 'शौक'ही करता येणार नाही आणि 'दोस्त'ही राहणार नाही. 'दरवाजा'च राहणार नसल्याने यायचे कोठून आणि जायचे कोठे हाही प्रश्न. असे अनेक दाखले देता येतील. ही भाषिक द्वैताची भावना ताणण्यास किती मर्यादा आहेत हेच केवळ त्यातून अधिक ठळकपणे अधोरेखित होईल. उर्दूस केवळ मुसलमानांची ठरवणाऱ्यांनी इतका विचार केला असण्याची शक्यता कमी. किंबहुना विचारशून्यतेची हमी हाच असल्या मागण्यांचा पाया असतो हे अनेकदा सिद्ध होते. हे झाले काही मूलभूत भाषिक मुद्दे. त्यापलीकडच्या सांस्कृतिक सौंदर्याचे काय? उर्दू ही केवळ मुसलमानांनाच आंदण दिली तर 'वो जो हममे तुममे करार था' त्याची आठवण करून देणाऱ्या बेगम अख्तर यांच्या गझलेवरही हिंदूंनी पाणी सोडायचे? फरिदा खानम यांना 'आज जानेकी जिद ना करो' हे गाताना ऐकले की हिंदूंनी करायचे काय? व्रजभाषेतील ठुमरी पेश करणाऱ्या बडे गुलाम अली खाँसाहेबांकडून 'बाजुबंद (कसे) खुल खुल जाय' हे समजून घ्यायचे नाही? फैज अहमद फैज, साहिर लुधियानवी, अमृता प्रीतम, जिगर मुरादाबादी, ख्वाजा निजामुद्दीन, कृष्णगीते गाणारा लखनौचा शेवटचा नबाब वाजिद अली शहा, पाकिस्तानच्या निर्मितीनंतरही 'वहाँ विश्वनाथजी कहाँ है' या प्रश्नाचे उत्तर न मिळाल्याने बनारसलाच राहून नियमितपणे मंदिरात सेवा अर्पण करणाऱ्या बिस्मिला खान यांचे आपण काय करणार? संपूर्णसिंह कालरा हे हिंदू. पण ते 'गुलजार' या नावाने उर्दू आणि हिंदी शायरी करतात. त्यांना मग मुसलमान ठरवायचे की हिंदूंत गणायचे? तेव्हा या इतक्या सगळ्या प्रश्नांचा गुंता निर्माण करून स्वतःच स्वतः त्यात अडकून पडण्याऐवजी उर्दूच्या नजाकतीचा लुत्फ घेणे अधिक आनंददायी. तसे करण्याचे दुसरे कारण असे की उर्दू ही कितीही परकीय ठरवायचा प्रयत्न केला तरी त्यात शंभर टक्के अपयशाचीच हमी. ती देता येते कारण भारत हीच उर्दूची मायभूमी आहे. साधारण बाराव्या तेराव्या शतकात खडी बोली आणि अन्य काही स्थानिक भाषांच्या संकरातूनच ती प्रसवली आणि या मातीत रुतली, बहरली. अमीर खुस्रो हा मुसलमान. पण त्याची कालातीत रचना 'छाप तिलक सब छीनी रे मोसे नैना मिलाइके' ही हिंदीत. तेव्हा केवळ धर्माच्या राजकीय कारणाने उर्दूला दूर करणे हा शुद्ध करंटेपणाच. सबब हिंदू-मुसलमान हा भेदाभेद करण्यात आनंद मानणे जितके अमंगल तितकेच उर्दू-हिंदीत 'त्यांचे-आपले' करणे क्षुद्रता निदर्शक. 'हिन्दी में और उर्दू में फर्क है तो इतना। वो ख़्वाब देखते हैं हम देखते हैं सपना।।' हेच वास्तव सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातून समोर येते. ते लक्षात घेतलेले बरे.

वास्तुरुपी राष्ट्रवैभव संवर्धन कोणाचे कर्तव्य?

(१८ एप्रिलः आंतरराष्ट्रीय वारसा दिन विशेष)



आपल्याकडे समाज एकसंध राहण्यासाठी कलाकृतीची मंदिरे बांधण्याचा प्रभाव यादव, शिलाहार काळापासून चालत आला आहे. युनेस्कोतर्फे १८ एप्रिल हा दिवस जागतिक वारसा दिन म्हणून साजरा केला जातो. लिखित स्वरूपाच्या इतिहासाबरोबर वास्तुरुपी राष्ट्रवैभवाचे योग्य संवर्धन करणे हे सरकार बरोबर सुजाण नागरिकांचेही कर्तव्य आहे. याची समाजमनाला जाणिव करून देण्यासाठी युनेस्कोतर्फे हा दिवस जागतिक वारसा दिन म्हणून साजरा केला जातो, त्यानिमित्ताने श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजींचा हा लेख... संपादक.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

आपल्याकडे समाज एकसंध राहण्यासाठी कलाकृतीची मंदिरे बांधण्याचा प्रभाव यादव, शिलाहार काळापासून चालत आला आहे. युनेस्कोतर्फे १८ एप्रिल हा दिवस जागतिक वारसा दिन म्हणून साजरा केला जातो. लिखित स्वरूपाच्या इतिहासाबरोबर वास्तुरुपी राष्ट्रवैभवाचे योग्य संवर्धन करणे हे सरकार बरोबर सुजाण नागरिकांचेही कर्तव्य आहे. याची समाजमनाला जाणिव करून देण्यासाठी युनेस्कोतर्फे हा दिवस जागतिक वारसा दिन म्हणून साजरा केला जातो, त्यानिमित्ताने श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजींचा हा लेख... संपादक.

आपल्या समाजमनात प्रौढशिक्षण, लैंगिकशिक्षण या विषयांप्रमाणे प्राचीन वारसावास्तूंचे महत्त्व आणि संवर्धनाबाबत अज्ञान, बेफिकिरी आणि उदासिनता आहे. हा विषय सर्वत्र पोचवायचा असेल तर दृकश्राव्य माध्यमाबरोबर साध्यासोप्या भाषेतून त्यावर विपुल लेखन होणे गरजेचे आहे. तरच संस्कारक्षम विद्यार्थ्यांपासून, अशिक्षित, असंस्कृत पर्यटकांना त्याची जाण येईल. पाश्चिमाथ्य राष्ट्रांसह इजिप्तसारख्या पुरातन वास्तूवैभवाच्या देशातील वारसासंवर्धनाच्या जाणीवेची उणीव आपल्याकडे प्रकर्षाने जाणवते. आमची अलौकिक कलाकृतीची मंदिरे ही फक्त धार्मिक ठिकाणच नव्हती, तर सभोवतालचा समाज एकसंघ राहण्यासाठी ती शैक्षणिक, सांस्कृतिक केंद्रे होती. हे आम्ही ध्यानात का घेत नाहीत? या मंदिरवास्तूंच्या व्यासपीठावरून नृत्य, किर्तन, गायन, प्रवचन, भारूड, पाठशाळा यांच्याबरोबर प्रांगणात आठवडी बाजार, जत्रा, मंडई उपक्रम राबवले जात होते. बरोबरीने न्यायनिवाडा करण्याचे ते एक समाजमान्य न्यायालयही होतेच. याशिवाय मंदिर माध्यमाद्वारे वाद घालून संवाद साधण्याचे हे लोकांचे एक हक्काचे ठिकाण होते. तर व्याख्यान, प्रवचनांद्वारे लोकोपयोगी माहिती पुरवण्याचा परिपाठ तर वाखाणण्याजोगा होता. आता हे सारे इतिहासजमा होताहेत, याचीच मनाला खंत वाटते!

पृथ्वीवर जशी काळानुरूप नैसर्गिक स्थित्यंतरे सतत घडत असतात, तशी अनेक क्षेत्रात मानव निर्मित घटकांतही परिवर्तन घडत असते. त्यात कला क्षेत्राप्रमाणे सांस्कृतिक तसेच ऐतिहासिक क्षेत्रातही बदल घडत असतात. त्यात मानवाने आपल्या संस्कृतीचे मापदंड गणल्या जाणाऱ्या कलाकृती निर्माण केल्यास त्यांना इतिहासाच्या पाऊल खुणांबरोबर धार्मिक अधिष्ठानासह सांस्कृतिक मोलही आहे. त्यातील काहींना राष्ट्राच्या अस्मितेची शान आहे. त्यात गडकोट, कमानी, राजवाडे, मनोरे, विजयस्तंभ प्रशासकीय इमारती आदींचा समावेश आहे. हजारो वर्षांच्या इतिहासात अनेक राज्यकर्त्यांनी आपल्या धर्माच्या आधारावर, तत्त्वप्रणालीनुसार लेणी, स्तुप, मंदिर, चर्च, मशीदी, मनोरे, कमानी उभारल्या, त्या वारसा वास्तु गणल्या गेल्या. लिखित स्वरूपाच्या इतिहासाबरोबर या राष्ट्रवैभवाचे योग्य संवर्धन करणे, हे सरकार बरोबर सुजाण नागरिकांचेही कर्तव्य आहे. याची समाजमनाला जाणिव करून देण्यासाठी युनेस्कोतर्फे १८ एप्रिल हा दिवस जागतिक वारसा दिन म्हणून साजरा केला जातो. आपल्याकडे समाज एकसंध राहण्यासाठी कलाकृतीची मंदिरे बांधण्याचा प्रभाव यादव, शिलाहार काळापासून आहे. वारसा वास्तुप्रकारात मंदिर वास्तूंचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यावरील कलाकृती ही पर्यटक, अभ्यासकांना भूरळ घालणारी आहे. परंतु दुर्दैवाने या बऱ्याच मंदिरांसह, लेण्या, गुहामंदिरे, गडकोट, कमानी यांची आजची अवस्था दयनीय असून त्यांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. आता नवीन मंदिरे उभारताना त्यावर मार्बल, ग्रेनाईट आदींचा साज चढवून ते सुशोभित करण्याच्या प्रयत्नात त्यांचा मूळ ढाचा, बाज, प्राचीन स्थापत्य कौशल्य नाहीसे होत चाललेय. त्यामुळे आमचा प्राचीन बांधकाम वारसाच नष्ट होतोय. आर्थिक पाठबळाच्या आधारावर नवीन मंदिरवास्तू उभारताना ज्या नवीन मंदिरवास्तू उभारल्या जाताहेत, पण प्रादेशिक वास्तुकलेच्या प्राचीन मंदिरांच्या संवर्धनाकडे दुर्लक्ष होत आहे. आधुनिकपणा बरोबर नावीन्याची कास धरताना आम्ही आमचा वैभवशाली वारसा विसरत चाललोय हेच यातून जाणवते.

भारतातील प्राचीन संस्कृती दर्शवणाऱ्या वारसावास्तू, लेण्या, स्तुप आदी पाहण्यासाठी जगभरचे पर्यटक, अभ्यासक येत असतात. मात्र इतिहासाचे मापदंड ठरलेल्या या घटकांच्या संवर्धनाची समाजात व शासकीय पातळीवरही जाणीव नाही, दुर्दैव! याकडे होणारे दुर्लक्ष अक्षम्य असून भावीकाळात हा राष्ट्रीय ठेवा इतिहासजमा होण्याची वेळ येऊन ठेपली आहे. परिसराचा विकास साधताना, धरण प्रकल्प निर्माण होताना प्राचीन वास्तूंना जलसमाधी का लाभली? याचे कुणालाच सोयरसुतक नाही. आपल्याकडे पुरातत्त्वखाते कायम उपेक्षितच राहिले आहेत. वारसा स्थळांच्याद्वारे प्राप्त होणारा महसूल अत्यल्प असेल, या कारणाने या खात्याकडे गांभीर्यानेही पाहिले जात नाही. देशातील वारसावास्तूंची संख्या आणि त्यांच्या संवर्धनासाठी मंजूर निधी, याचे प्रमाण तर हास्यास्पद आहे. लोप पावलेल्या अज्ञात संस्कृतीला जनमानसासमोर आणून तिच्या इतिहासासह त्यावेळच्या समाजजीवनावर प्रकाश झोत टाकण्याचे काम पुरातत्त्व अभ्यासाद्वारे होत असते. हेच पुरातत्व शास्त्राला अभिप्रेत आहे. इ.स.१७८४मध्ये आपल्या देशात एशियाटिक सोसायटीची स्थापना करून पुरातत्व शास्त्राचा पाया घातला गेला. त्याला शास्त्रीय अभ्यासाची जोड देण्यासाठी १८६० साली आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया ही अस्थापना स्थापन करून ब्रिटिश प्रशासकांनी पुरातत्वखात्याला प्रोत्साहन दिले होते. ग्रामीण भागात प्राचीन मूर्ती विरघळत, शिलालेख रस्त्याच्या कडेला उनपावसात तडाखे सोसत उभे आहेत, तर काही वारसा वास्तूंचे अवशेष आपल्या घरांच्या पायऱ्यासाठीही वापर करून आपली गरज भागविली जात आहे. येथील काही किल्ले, लेण्या, स्तंभावर खडू-कोळशाने आपले नाव ठळकपणे लिहून आपण या ठिकाणी आपल्या मैत्रिणींसह भेट दिल्याचा पुरावा दर्शवणाऱ्या खुणा पाहून पर्यटकांच्या असंस्कृतपणाची कीव करावीशी वाटते. खरं तर, ही पुरातन कलाकृती निर्माण करणारे कलाकार अज्ञात आहेत, परंतु असले आचरटाचार्य पर्यटक सवंग प्रसिद्धीच्या हव्यासापोटी या वास्तूसौंदर्याला बाधा आणतात. जसा निसर्गाचे मोल जाणणारा पर्यटक वनपर्यटनाला हवा आहे, तसाच वारसा वास्तूचे मोल जाणणारा अभ्यासूपर्यटक असेल, तरच या राष्ट्रवैभवाचे संवर्धन होईल. भूकंपासारख्या आपत्तीतही काही प्राचीन मंदिर वास्तूंवर परिणाम झाला नाही तेव्हा पूर्वीच्या बांधकाम तंत्रज्ञानाचा अभ्यास करून या शास्त्राच्या आधारावर इमारती बांधकामाचे तंत्रज्ञान विकसित करण्याचा विचारही आम्हाला सूचत नाही.

खोदकाम करताना अनेकदा जुन्या वस्तू, मूर्ती आढळतात. त्या शैक्षणिक संस्था, ग्रामपंचायत तालुका तहसिलदार यांच्याकडे जमा करून अखेरीस प्रत्येक जिल्हा पातळीवर चांगले वस्तुसंग्रहालय निर्माण होणे शक्य आहे. पण सरकारी जाच-काच व नियमांचा कोलदांडा टाकण्यासाठी याची कुठेच नोंद होत नाही. त्यासाठी सुजाण नागरिकांबरोबर लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेणे आवश्यक आहे, पण हा ठेवा जतन करण्यासाठी अभ्यासू लोकप्रतिनिधी व प्रशासकांची आवश्यकता आहे. शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वारसा वास्तू दर्शन सहलींचे हेरिटेज वर्क आयोजन करून या वारसावास्तू स्थळदर्शनाद्वारे या अनमोल ठेव्याचे संवर्धन करणे कसे आवश्यक आहे, हे त्यांच्या मनावर बिंबवता येईल. त्यासाठी प्रथमतः त्यांच्या अभ्यासक्रमातच या विषयाचा समावेश करावा लागेल. बऱ्याचदा सहल व्यवस्थापक गाईडची भूमिका पार पाडतो. आयोजित सहलीचे वेळापत्रक सांभाळणारा हा व्यवस्थापक वारसा वास्तू अभ्यासक, मार्गदर्शक असेलच असे नाही. तो स्थानिक मार्गदर्शकांकडे पर्यटकांच्या गटाला सोपवून मोकळा होतो. यासाठी सहल व्यवस्थापकानाच वारसावास्तू मार्गदर्शनाचे प्रशिक्षण हवे. बऱ्याच पर्यटकांना वारसा स्थळ दर्शनापेक्षा भोजन खरेदीतच जास्त स्वारस्य असते. अनेक वारसावास्तू स्थळ दर्शनात अधिकृत मार्गदर्शकच नसतो आणि जो स्थानिक स्वयंघोषित मार्गदर्शक असतो, ती तर प्रचलित दंतकथा सांगत या ठिकाणी कोणत्या चित्रपटांचे छायाचित्रण झाले हे सांगण्यात धन्यता मानतो व ऐकणारे पर्यटकही आपली सहल सत्कारणी धन्यता मानतो. ऐकणारे पर्यटकही आपली सहल सत्कारणी लागल्याचं समाधान घेऊन भोजन- खरेदीसाठी तत्परतेने परततील. किंवा या स्थळाची आजची अवस्था पाहून सरकारी यंत्रणेला दोष देत काही वेळ हळहळतील, पण याच ठिकाणी आडोशाला मद्यपानाचा आस्वाद घेऊन सहलीचा आनंद द्विगुणीत करतील. फार तर घरी परत त्यावर एखाद्या वृत्तपत्रातून त्या वारसा स्थळाच्या आजच्या सोचनीय स्थितीबद्दल पत्र प्रसिद्ध करून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडल्याच समाधान मानणारे पर्यटक भरपूर आहेत.

वैयक्तिक छंद म्हणून काहींनी स्वतःचे वस्तुसंग्रहालय उभारले आहे. त्यांना शासकीय मान्यतेसह अनुदान दिल्यास प्राचीन वारसा संवर्धन कामाला प्रोत्साहन मिळेल. काही कुटुंबांकडे जुनी शस्त्रे, वस्तू आहेत त्यांनाही मदतीसह आवाहन करून हा ठेवा संग्रहालयात सुपूर्द करण्यासाठी प्रोत्साहन दिल्यास संग्रहालयात त्याचे योग्य जतन होईल. सक्षम ज्येष्ठ नागरिकांच्या ज्ञानासह त्यांच्या क्षमतेचा उपयोग करून घेतला जात नाही. इतिहास, प्राचीन वास्तू, संस्कृती यात गती असलेल्या ज्येष्ठांना मार्गदर्शक म्हणून काम करण्याची तयारी असूनही त्यांच्या आवाहनाला शासन दरबारी प्रतिसाद नाही. काही वारसा वास्तूसमुहाची परिक्षेत्र व्याप्ती मोठी असते, तेव्हा प्रवेश द्वारीच मार्गदर्शक नकाशा व संक्षिप्त माहितीफलकच नसतो आणि जो असतो तो वाचणे अशक्य असते. मात्र असल्या स्थळी प्रवेश शुल्क तत्परतेने आकारले जाते. आता मानवनिर्मित वारसा कलाकृती बरोबर काही नैसर्गिक स्थळांची दखल युनेस्कोने घेऊन त्यांचाही जागतिक वारसा स्थळात समावेश केला आहे. त्यात महाराष्ट्रातील पश्चिम घाट क्षेत्रातील चार स्थळांचा समावेश झाला आहे. परंतु या अजस्त्र घाटमाथ्यावरील निसर्गराजा जसा आम्हाला खचितच क्षमा करणार नाही, तसेच वारसा वास्तूसंवर्धनाची उपेक्षाही हेच सांगते, हे विशेष!

!! विश्व वारसा दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

वाट...

आडमुठ्या डोंगरा
वळणदार ती वाट
सुबक पणे चालते
काय वर्णावा थाट

चुकल्या पांथस्था
सहज दाखवी वाट
सावकाश चाल बा
अवघड आहे घाट

अधूनमधून निर्झरी
गारवा वाहती पाट
अधे मधे ठेचकाळे
दगडां धोंड्या गाठ

वाट चालकाळोखी
आप्त फिरवी पाठ
साथदेतीलं काजवे
उजळे अंधार दाट

दोष द्यावा इतरांना
नेहमी ही वहिवाट
पाऊल चुकेआपले
निंदा नशीब ललाट

सोपे नसते कधी रे
बांध मनी खूणगाठ
निश्चित हवा निश्चय
उदिष्ट स्वादिष्ट गाठ

- हेमंत मुसरीफ पुणे .
९७३०३०६९९६..

समाजभान...

समाजात
वावरता
ठेवावे समाजभान
अलिप्त नते राहणे
मिसळून जाईछान

प्रवाहां संगे प्रवास
धारेचे ठेवावे ध्यान
सहजतेने प्रवाहित
विसंगती करे म्यान

मैफिली सम्मिलीत
सुरांचाहवा सन्मान
बिघडू नका कोरस
समरस होई समान

भजनी मंडळ रंगले
आर्तस्वरांत गागान
ना जांभया आळस
एक रूपात लुभान

चालत राहता रांगेत
ठेव पाऊल अवधान
बिघडू नये कधी लय
सदासतर्क सावधान

ऑड मॅन का आऊट
विचीत्र वेगळे नादान
एकात्म प्रयास असो
इतकेशक्य रे निदान

- हेमंत मुसरीफ पुणे .
९७३०३०६९९६..

विविध योजनांच्या अंमलबजावणीतून शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणार :मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

विदर्भातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना ८३१.६७ कोटी रुपये सानुग्रह अनुदानाचे वितरण
अमरावती विभागातील प्रकल्पग्रस्तांना प्रातिनिधीक स्वरुपात धनादेशाचे वितरण

वृत्तसंस्था ■ अमरावती

अमरावती : सन २००६ ते २०१३ दरम्यान विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी सरळ खरेदीने भुसंपादन करण्यात आलेल्या जमीनीचा कमी मोबदला मिळाला असल्याने प्रकल्पग्रस्तांवर अन्याय झाला होता. हा अन्याय दूर करण्यासाठी राज्य शासनाने या कालावधीतील सरळ खरेदीने संपादीत केलेल्या क्षेत्राकरीता पाच लक्ष प्रति हेक्टर दराने १६ हजार ६३३ हेक्टर क्षेत्राकरीता ८३१ कोटी ६७ लक्ष रुपये सानुग्रह अनुदान वितरीत करण्यास मान्यता दिली असून ही रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे. यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना खूप मोठा दिलासा मिळाला असून यापुढेही विविध शेतीविषयक योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणार, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

अमरावती येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात अमरावती विभागातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात सानुग्रह अनुदानाचे धनादेश मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, कामगार मंत्री आकाश फुंडकर, खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार सर्वश्री प्रताप अडसड, रवी राणा, केवलराम काळे, प्रवीण तायडे, राजेश वानखडे, उमेश यावलकर, संजय कुटे, श्रीमती कैकई डहाके, माजी आमदार प्रवीण पोटे पाटील तसेच विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे संस्थापक तथा अध्यक्ष मनोज चव्हाण आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, सन २००६ ते २०१३ दरम्यान विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी सरळ खरेदीने भुसंपादन करण्यात आलेल्या जमीनीचा अत्यल्प मोबदला मागील सरकारने शेतकऱ्यांना दिला होता. तर २०१३ नंतर भुसंपादन केलेल्या जमीनीचा चारपट मोबदला संबंधित प्रकल्पग्रस्तांना देण्यात आला. ही खूप मोठी तफावत, झालेला अन्याय दूर सारण्यासाठी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे अध्यक्ष मनोज चव्हाण यांच्या नेतृत्वात अनेक आंदोलने केली. आमदार प्रताप अडसड यांनी सुध्दा याविषयी सातत्याने पाठपुरावा केला. अन्याय झालेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सन २०१४ मध्ये स्थापित नवीन सरकारने याबाबत कायदेशीर सल्ला मिळविला. यावर मार्ग काढण्यासाठी बैठकीत कसोशीने प्रयत्न करण्यात आले. कायद्याचे मार्ग बंद झाल्याने अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी सानुग्रह अनुदानाचा महत्वपूर्ण निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. आज निधी वाटपाचा शुभारंभ माझ्या हस्ते होत आहे, ही अतिशय आनंदाची गोष्ट असून याबाबत मी समाधानी आहे, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले की, अन्याय करणारा कायदा बदलविला तरच संबंधितांना न्याय मिळवून दिला जाऊ शकतो. संघटनेचे अध्यक्ष यांनी मांडलेल्या मागणीनुसार मृद व जलसंधारण विभागाने अधिग्रहीत केलेल्या जमीनीसाठी शासन निर्णयात सुधारणा करुन संबंधितांना मोबदला मिळवून दिला जाईल. प्रकल्पग्रस्तांसाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापित करुन बीज भांडवल उपलब्ध करुन दिल्या जाईल, ज्यातून ते छोटा मोठा उद्योग सुरु करु शकणार. प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोकऱ्यांमध्ये आरक्षण वाढविण्यासंदर्भात सर्व बाबी तपासून योग्य निर्णय घेण्यात येईल. प्रकल्पग्रस्तांना सर्व सुविधा पुरविण्यात येणार. २००६ ते २०१३ दरम्यानच्या भुसंपादीत शेवटच्या प्रकल्पग्रस्ताला लाभ मिळेपर्यंत योजना बंद होणार नाही. विदर्भात अनेक प्रकल्पांसाठी भुसंपादन करण्या आले आहे, संबंधित प्रकल्पग्रस्तांना टप्प्या टप्प्याने अनुदान दिल्या जाणार आहे. अनुदानाची रक्कम बँक खात्यात जमा करण्यासाठी कोणत्याही भुलथापांना बळी पडू नका, प्रत्येकाची अनुदानाची रक्कम विभागाद्वारे संबंधितांच्या खात्यात जमा करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

शेतकरी हा राज्याचा पोशींदा आहे. त्यानुसार शेतकऱ्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी राज्य शासनाकडून आगामी काळात विविध महत्वाकांक्षी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. बळीराजा नवसंजीवनी योजनेतून प्रकल्प उभारण्यात येणार आहे. पुढील काळात वैनगंगा नळगंगा नदी जोड प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकरी आनंददायी होणार आहे. यातून सुमारे ६०० किमीची नदी निर्माण करण्यात येणार असून पश्चिम विदर्भातील पाच जिल्हे तर पूर्व विदर्भातील सात जिल्ह्यांना शाश्वत सिंचनाची सोय होणार असून १० लाख हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येणार आहे. शेतकऱ्यांना दिवसाला बारा तास मोफत वीज उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी व्हॅल्यू कस्टर निर्माण करण्यात येणार याद्वारे टेक्सटाईल उद्योग भरभराटीस येईल. नानाजी देशमुखा कृषी संजीवनी योजनेतून शेती व शेतीपुरक उद्योगांसाठी खते, निविष्टा व यांत्रिकीकरणासाठी ६ हजार कोटी निधी दिला जाणार आहे. यातून प्रत्येक गावांचा व तेथील शेतजमीनीचा सर्वांगिण विकास साधला जाईल. शेतीमध्ये गुंतवणूक वाढविण्यावर भर दिला जाणार असून गावातील स्थानिक संस्था बळकट करण्यासाठी वर्ल्ड बँकेकडून निधी उपलब्ध करुन दिला जाईल. ?ग्रीस्टॅक योजनेतून ९६ लाख शेतकऱ्यांच्या जमीनीचे डिजीटलायझेशन करण्यात आल्याने पीक पाहणी, जमीन मोजणी इत्यादी कामे सॅटेलाईटव्दारे नोंदणी केली जात आहे. गटशेती, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देवून विषमुक्त शेतीसाठी उपक्रम राबविण्यात येणार आहे. शेतीमध्ये गुंतवणूक वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून शेतकऱ्यांचे जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करणार, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

प्रकल्प निर्मितीसाठी ज्यांच्या जमीनी संपादीत करण्यात आल्यात त्यांना वेळेत मोबदला मिळवून देणे हे राज्य शासनाचे काम आहे. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना पाच लक्ष रुपये प्रति हेक्टर प्रमाणे सुमारे ८३२ कोटी रुपये सानुग्रह अनुदान संबंधितांच्या खात्यात जमा

नोकरीसाठी रुपये २० लाखांची लाच देऊनही पूर्ण पगार नाही:त्रस्त शिक्षकाने संपवले जीवन: सर्वत्र शोककळा

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : शिक्षकाच्या नोकरीसाठी रुपये २० लाखांची लाच दिली. तरीही पूर्ण पगार मिळत नसल्याने त्रस्त प्राथमिक शिक्षकाने आपले जीवन संपवले. ही दुःखद् घटना वाऱ्यासारखी पसरताच परिवारासह पंचक्रोशीत सर्वत्र शोककळा पसरली गेली.

परभणी जिल्ह्यातील व मानवत तालुक्यातील मंगरूळ (बु.) येथील नृसिंह प्राथमिक शाळेत कार्यरत प्राथमिक शिक्षकाने परभणी शहरापासून काही अंतरावरील पेडगाव शिवारात ही दुर्दैवी घटना घडली आहे. मागील बऱ्याच कालीवधीपासून पाठपुरावा करुनही त्यात अपयश येत असल्याने त्रस्त शिक्षकाने गुरुवारी पहाटेच्या सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केली. खेदजनक बाब म्हणजे या शिक्षकाने आत्महत्येपूर्वी एका कागदावर लिहिलेली सुसाईड नोट समाज माध्यमावर व्हायरल झाली आहे. त्यामध्ये संस्था सचिवांना उद्देशून लिहिलेल्या त्या नोट्स मध्ये पगार बिल, अनुदानाबाबत भयंकर गंभीर आरोप केले आहेत.

सोपान उत्तमराव पालवे, असे मयत शिक्षकाचे नाव आहे. पालवे हे सेलू तालुक्यातील आडगाव दराडे येथील रहिवासी असून ते मानवत तालुक्यातील मंगरूळ (बु.) येथील श्री नृसिंह शिक्षण प्रतिष्ठान संचालित प्राथमिक विभागात शिक्षक म्हणून मागील चार वर्षांपासून कार्यरत होते. या पदासाठी त्यांना नोकरीवर घेण्यासाठी संस्थेचे सचिव बळवंत खळीकर यांनी त्यांच्याकडून रुपये वीस लाख लाच म्हणून घेतले होते. त्यावेळी खळीकर यांनी थोड्या कालावधीनंतर या शाळेत चाळीस टक्के अनुदानित पदावर घेतो, असे सांगितले होते. संस्था आणि सचिव या दोघांवर विश्वास ठेऊन ऐपत नसतांनाही रुपये वीस लाख एवढी लाच दिली. तथापि तेवढी रक्कम घेऊनही बोलल्याप्रमाणे मार्च २०२४ च्या बिलामध्ये आश्वासित बिल न काढता ६० टक्के अनुदानाऐवजी ते बिल २० टक्के अनुदान याप्रमाणे काढले. याप्रकरणी वेळोवेळी पाठपुरावा करुनही शिवाय टप्पा वाढीसाठी घेतलेली रक्कम याबाबत विचारणा केली असता संस्था सचिवांनी चक्क धमकी दिली. त्यामुळे घाबरलेल्या संबंधित शिक्षकांच्या ही धमकी जिव्हारी लागली गेली. किंबहुना त्यासाठीच ही आत्महत्या करावी लागली, असे त्या सुसाईड नोटमध्ये नमूद केले आहे. संस्था सचिवांनी दिलेली धमकी असह्य न झाल्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी माझी घोर फसवणूक करण्यात आली असून मला आत्महत्या करण्यास भाग पाडल्याबाबत सोपान पालवे यांनी त्यात नमूद केले आहे. नृसिंह शिक्षण 'आत्महत्या करण्यास भाग पाडल्याबाबत सोपान पालवे यांनी नृसिंह शिक्षण प्रतिष्ठानचे सचिव बळवंत खळीकर यांच्याविरुद्ध हे आरोप सुसाईड नोटमध्ये लेखी स्वरूपात केले आहेत.

या दुःखद घटनेने पंचक्रोशीसह जिल्हाभरातील संपूर्ण शिक्षण क्षेत्रात प्रचंड खळबळ उडाली आहे. दरम्यान, मयत सोपान पालवे यांच्या पश्चात पत्नी सागर पालवे आणि एक मुलगी स्नेहल पालवे असा परिवार आहे. त्यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन परभणी येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात त्यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी गुरुवारी दुपारी आणण्यात आला. याप्रकरणी परभणी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून तपास कामी प्रक्रिया युध्दपातळीवर सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक श्रीकांत डोंगरे यांनी दिली आहे.

अनंता टोम्पे खून प्रकरणातील तीघे आरोपी पोलिसांच्या ताब्यात

परभणी ■ वसंत आवटे



पाथरी पोलीस ठाण्यात बुधवारी दाखल झालेल्या अनंता टोम्पे खून प्रकरणातील तीन आरोपींना परभणी व पाथरी पोलिसांच्या वतीने संयुक्त कारवाई करीत ताब्यात घेतले. रूपाली अनंता टोम्पे यांनी दिलेल्या माहितीवरून पाथरी पोलीस ठाण्यात गुरनं १९७/२५ मध्ये भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१), ३ (५) अन्वये आरोपी भारत वाव्हळे, राहुल शिंदे आणि अशोक खंडागळे या तिघांवर खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला होता. या आरोपींनी संगनमत करून १४ एप्रिलच्या दुपारी २.३० ते १५ एप्रिलच्या दुपारी २ वाजेच्या दरम्यान अनंता टोम्पे याने उधारीचे पैसे परत न दिल्याच्या कारणावरून जिवे मारल्याची माहिती देण्यात आली होती. यात आरोपींनी अनंता टोम्पे यास त्यांच्या घरातून बोलावून बाहेर नेवून मारहाण केली. तसेच मृतदेह शहरातील सार्वजनिक शौचालयात टाकला होता. या प्रकरणात कुटुंबियांनी आरोपी ताब्यात घेईपर्यंत मृतदेह ताब्यात न घेण्याची भुमिका घेतली होती. या प्रकरणाचा तपास लवकरात लवकर करून आरोपींना ताब्यात घेण्यात येईल, असा शब्द पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी कुटुंबियांना दिला होता. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तपासासाठी पाथरी पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हा शाखेचे पथक तयार करण्यात आले. तपासा दरम्यान पोलीस पथकास आरोपी पुणे येथे असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने पुणे येथील वाघोली परिसरातील एका पेट्रोलपंपावरून राहुल नामदेव शिंदे आणि अशोक श्रीपती खंडागळे या दोघांना ताब्यात घेतले. ही कारवाई गुरूवारी (दि.१७) करण्यात आली. आरोपींनी चौकशी दरम्यान आर्थिक देवाण-घेवाणीतून अनंता हरिभाऊ टोम्पे याला मारहाण केल्याचे सांगितले. या घटनेनंतर आरोपी पुणे येथे पळून गेल्याचेही सांगितले. चौकशी दम्यान आरोपींनी या गुन्ह्यात त्यांच्यासोबत अनिल बालासाहेब उफाडे हा सहभागी असल्याची माहिती दिली. या माहितीवरून सुसगाव येथून अनिल उफाडे यास ताब्यात घेतले. याचबरोबर पाथरी पोलिसांनी संजय आश्रोबा शिंदे आणि कपिल दगडोबा गवारे यांनाही चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आर. एस. मुत्येपोड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मधुकर चट्टे, सुग्रीव केंद्रे, निलेश भुजबळ, फारूखी, गणेश कौटकर, पाथरी पोलीस ठाण्याचे महेश लांडगे, स्वामी, घाईवट, कापूरे, सांगळे, लटपटे, शितळे, मुजमुले, घुगे, सायबर पोलीस स्टेशनचे संतोष वावळ, बालाजी रेड्डी व गणेश कौटकर यांच्या पथकाने केली.

ना. म. का. च्या पाण्यासाठी तीन दिवसापासून शेतकरी बसले उपोषणाला

गंगापूर ■ सुनिल झिंजुर्डे पाटील



गंगापूरः भाम, वाकी, मुकणी, भावली, या सर्व धरणाची साधारतः ५० टक्क्याच्या पुढे पाणीसाठा उपलब्ध असताना देखील पश्चिम महाराष्ट्रात नांदुरमधमेश्वर कालव्याचे पाणी सुरु असून गंगापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना सोडण्यात यावे यामागणीसाठी गंगापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी नांदूर मधमेश्वर कालव्याचे पाटबंधारे विभागाच्या गंगापूर येथील कार्यालयासमोर १५ एप्रिल पासून अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे.

नांदूर मधमेश्वर कालव्याच्या संबंधित अधिकाऱ्यांनी ५ एप्रिल रोजी गंगापूर वैजापूर तालुक्यासाठी कालव्यात पाणी सोडणार म्हणून शेतकऱ्यांना आश्वासन दिले होते मात्र १५ एप्रिल ऊजेडला पाणी काही सोडण्यात आले नाही लोकप्रतिनिधींच्या दबावाखाली संबंधित अधिकाऱ्यांच्या

संगणमताने गंगापूर तालुक्यातील हक्काचे पाणी ना.म.का. उजवा कालवा व कोपरगाव कालव्यास सोडण्यात आले असून सतत असाच अन्याय करणार असाल तर सहन करणार नसुन पाणी न सोडल्यास नागपूर --मुबंई महामार्गावर रास्ता आंदोलन करणार आहे.

गंगापूर --वैजापुर ना.म.का.धरणावरील एक्सप्रेस कालवा नादुरूस्त २ गेट तात्काळ दुरूस्त करण्यात यावे. ज्यावेळेस उजवा कालवा चालु होईल त्याच वेळेस डावा एक्सप्रेस कालवा चालु झाला पाहिजे. ज्याप्रमाणे रोटेशन पाणी इतर कालव्यास सोडण्यात आलेले आहे तसेच

गंगापूर येथील शेतकऱ्यांना रोटेशन पाणी उपलब्ध करून देण्यात यावे. शासकीय नियमाप्रमाणे आमचे हक्काचे ११ टि.एम.सी पाणी आम्हाला कायमस्वरूपी उपलब्ध करून देण्यात यावे त्यात कसुर करण्यात येवू नये. यासह आदी मागण्यांसाठी गंगापूर तालुक्यातील मालुंजा, शिरजगाव, संजरपूर, हदियाबाद येथील शेतकऱ्यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. यामध्ये संदीप पवार, नानासाहेब गात, तात्याराव सिरसाठ, निवृत्ती सोनवणे, संदीप सुकासे, नारायण वारकर, अर्जुन सुकासे यांचा समावेश आहे.

धारूर तालुक्यात बहुतांश शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीच निघेनात: तहसीलदारांचे दुर्लक्ष

तेलगाव ■ सोमेश्वर सोनटक्के



तेलगावः शेतकऱ्यांना कुठल्याही योजनांचा लाभ घ्यायचा असेल तर फार्मर आयडी काढुन घेणे बंधनकारक केले. मात्र धारूर तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांचा फार्मर आयडीच निघत नाही. त्यामुळे त्यांनी काय करावे. असा प्रश्न निर्माण होत आहे. तर याबाबत धारूरचे तहसीलदार यांना विचारणा करण्यासाठी फोन केला असता त्यांचा मोबाईल फोन लागतच नाही. शिवाय मॅसेज केला तर ते त्याचे उत्तर देत नाहीत. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचा आयडी निघत नाही. त्यांना भविष्यात कांही अडचण आल्यास याच तहसीलदार यांना जबाबदार धरावे. अशा प्रतिक्रिया शेतकरी व्यक्त करत आहेत.

शेतकऱ्यांना आता कुठल्याही शासकीय योजनांचा लाभ घ्यायचा असेल तर शेतकऱ्यांना आपला फार्मर आयडी (शेतकरी ओळख) काढुन घेणे शासनाने बंधनकारक केले आहे. यासाठी प्रथम ३१ मार्च ही अंतिम तारीख दिली होती. परंतु यावेळेत सर्वच शेतकऱ्यांचा आयडी निघाला नाही. त्यामुळे यास मुद्दत वाढ देण्यात आली. त्यातच धारूर तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांचा फार्मर आयडी काढताना अनेक अडचणी येत आहेत. याबाबत शेतकरी संबंधित सीएससी केंद्रात फार्मर आयडी निघत नसल्याने संबंधित तलाठी, कृषी पर्यवेक्षक आणि यासंबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्याशी संपर्क साधुन आयडी काढताना आलेल्या अडचणींवर मार्ग विचारत आहेत. मात्र यासंदर्भात कुणालाच मार्ग माहिती नाही. त्यामुळे शेतकरी तालुक्याचे जबाबदार अधिकारी असलेल्या तहसीलदार यांना मोबाईल फोन लावून अडचणींवर मार्ग विचारत आहेत. मात्र धारूरचे तहसीलदार यांचा मोबाईल फोन लागतच नाही. याबाबत कांही शेतकऱ्यांनी सदर तहसीलदार यांनी मॅसेज करून, फार्मर आयडी काढताना अडचण येत असल्याचे सांगितले. परंतु तहसीलदार यांनी त्या मॅसेजचेही उत्तर दिले नाही. त्यामुळे धारूर तहसीलदार यांचा शासनाच्या या विशेष योजनेत किती सहभाग आहे हे लक्षात येते. तर आमचा फार्मर आयडी न निघाल्याने आम्हाला भविष्यात कांही शासकीय योजनांना पासुन वंचित राहावे लागले, तर आमच्या होणाऱ्या नुकसानीस धारूर तहसीलदार हेच जबाबदार राहतील. व आमची झालेली नुकसान भरपाई त्यांच्याकडूनच वसुल करून घ्यावी. अन्यथा आम्हाला लोकशाही मार्गाने कडक आंदोलनाचे पाऊल उचलावे लागेल. असा इशारा धारूर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी दिला आहे. चौकट मी गेल्या अनेक दिवसापासून फार्मर आयडी काढण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे आगामी काळात शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सर्व शासकीय योजना प्राप्त करून घेण्यासाठी फार्मर आयडी असणे गरजेचे आहे त्यामुळे माझे आयडी निघत नसल्याने मी अनेकदा धारूर ते तहसीलदार निळे यांच्याशी संपर्क केला परंतु त्यांचा संपर्क होत नाही त्यामुळे व्हाट्सअप वर संदेश पाठवला त्यालाही तहसीलदार यांच्याकडून कसलाही प्रतिसाद मिळत नाही अशी प्रतिक्रिया शेतकरी बालाप्रसाद पांडुरंग जी जाजू यांनी दिली.

महर्षीनगरचे ग्रामदैवत पवनपुत्र श्री हनुमान जन्मोत्सव साजरा

सातारा ■ अर्चना जगताप



साताराः महर्षीनगर हनुमान सार्वजनिक सेवा मंडळाच्या वतीने महर्षीनगर ग्रामदैवत श्री हनुमान जन्मोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. यावेळी पहाटे अभिषेक व हनुमान जन्म व आरती, धार्मिक विधी पार पडला. परिसरातील नागरिक भक्तगण यांनी दर्शनाला तुडुंब गर्दी केली होती. सायंकाळी महर्षीनगर व मुकुंदनगर मधील जेष्ठ महिला भजनी मंडळ यांनी संगीतबद्ध भक्तीमय गीत सादर केले. उत्सवानिमित्त आलेल्या मान्यवर मंडळींनी सन्मानित करुन नागरिक भक्तगण यांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी अशोकराव हांडे, किसनराव पवार, राहुल गुंड, मधुकर सुर्यवंशी, गजेंद्र गुंड, अरुण शिरोळे, प्रविण चोरबेले, कुंवर सिंग परदेशी, सुहास देशपांडे, संतोष खिंवसरा, चारुदत्त ओझरकर, सुरेश तपस्वी, राजेश हांडे, अशिश भोयार, महेश शिंदे, शाम कर्नावट, राम कुंभार, शाम खंडेलवाल, पियुष गुंड, राजश्री शिळीमकर, पुष्पाताई चिकणे, भारती घोलप, सुलोचना जनगावे, मीना साळवी, सुशीला काळे, पुष्पा गायकवाड, सरस्वती गाडेकर यांच्या उपस्थितीत उत्सव सोहळा संपन्न झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त श्री स्वामी समर्थ ट्रस्ट च्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन



सातारा ■ अर्चना जगताप

सातारा : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त श्री स्वामी समर्थ ट्रस्ट मठ महर्षीनगर वतीने बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. तसेच यावेळी श्री. निलेशभाऊ आल्हाट व श्री. अनिलभाऊ परदेशी यांनी जयंतीनिमित्त आलेल्या सर्व अनुयायींना डालचा भात व खिचडी वाटप करण्यात आले. या उपक्रमात गजेंद्र गुंड, निलेश आल्हाट, अनिल परदेशी, राहुल गुंड, शशिकांत पावशे, संतोष ठक्कर, सागर गायकवाड, दिनेश शिंदे, पियुष गुंड सहभागी होऊन सर्वांना मंगलमय शुभेच्छा दिल्या.

सातारा येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय व्याख्यान स्पर्धेत जगदीश कांबळे सर यांचे नेत्रदीपक यश

वाई ■ प्रशांत थोरवे



वाई : फुले-शाहू -आंबेडकर प्रबोधन मंच, सातारा आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त दि. ११,१२ व १३ असे तीन दिवशीय कार्यक्रम प्रताप सिंह हायस्कूल, सातारा येथे साजरे करण्यात आले. राज्यस्तरीय रेखाचित्र स्पर्धा, राज्यस्तरीय व्याख्यान स्पर्धा व विविध गुणदर्शन स्पर्धा हे कार्यक्रम पार पडले . बाबासाहेबाचे पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण याच हायस्कूलमध्ये झाले होते.

दि. १२/०४/२०२५ राज्यस्तरीय व्याख्यान स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धा वेगवेगळ्या गटात झाल्या. दि. १३/०४/२०२५ या दिवशी बक्षीस वितरण कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वसंत हंकारे सर यांनी केले. बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मराठी सिनेसृष्टीतील अभिनेते श्री. किरण माने सर यांची उपस्थिती लाभली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्पर्धेतील सर्व विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र, बक्षीस व सन्मानचिन्ह देण्यात आले.

यावेळी राज्यस्तरीय व्याख्यान स्पर्धा खुला गट (१९ वर्ष पुढील) विजेत्या मध्ये तृतीय क्रमांक जगदीश आत्माराम कांबळे सर यांचा आला. वहागाव ता. जावली जि. सातारा. येथील सर रहिवासी आहेत. सरांच्या व्याख्यानाचा विषय होता भारतीय संविधान लोकशाहीचा प्राण आणि आजचे समाज वास्तवङ. प्रमुख पाहुणे श्री. किरण माने यांच्या हस्ते सरांना प्रमाणपत्र, बक्षीस व सन्मानचिन्ह देण्यात आले.

'समता, बंधुता, लोकशाही, मानवता या मूल्यांतून देशा बद्दलचा लाख मोलाचा आदर प्रत्येकाच्या व्याख्यानातून प्रखरपणे दिसून आला. त्यामुळे उद्याच्या भारताची काळजी राहत नाही ' असे गौरवोद्गार प्रमुख पाहुण्यांनी व्याख्यात्याबद्दल काढले. शेवटी प्रा. प्रकाश कांबळे. यांनी सर्वांचे आभार मानले कार्यक्रमाची सांगता झाली.

रेल्वेमध्ये एटीएम : देशात पहिली सुविधा

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : मनमाड-मुंबई दरम्यान धावणाऱ्या पंचवटी एक्स्प्रेसमध्ये प्रवाशांना एटीएमद्वारा पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. देशातला हा पहिलाच प्रयोग. प्रवासी वर्गात उत्साह व आनंद. सुरक्षित आर्थिक व्यवहार ! मुंबई-नाशिक-मनमाड दरम्यान प्रवासी वाहतूक करणाऱ्या पंचवटी एक्स्प्रेसमध्ये नुकताच एटीएम सुविधेची चाचणी घेण्यात आली असून ती यशस्वी असल्याचे समजतेय.

देशात पहिल्यांदाच रेल्वेमध्ये एटीएमची सुविधा देण्यात आली आहे. जी-पे, किंवा फोन-पे तथा अशाच इतर ऑनलाईन अशा निरनिराळ्या पेमेंट सुविधांचा वापर हल्ली मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. सध्या बाजारात होणारे व्यवहार प्रामुख्याने अशा पेमेंट सुविधांवर अवलंबून आहेत. ग्राहकांसाठी ही सुविधा महत्त्वाची असली, तरी यामुळे अनेकांची अनेकदा पंचाईत होण्याचे प्रसंगही उद्भवतात. खिशात रोख रक्कम ठेवण्याचीच सवय मोडू लागल्यामुळे ऐनवेळी रोख रक्कम लागल्यास अडचण होते. असाच काहीसा प्रकार वाटत असला तरी तो सुरक्षित आहे. रेल्वेनं प्रवास करताना नानाविध सहज अडचणी घडू शकतात. पण सुरक्षेच्या दृष्टीने भारतीय रेल्वेनं अत्यंत महत्त्वाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे!

रेल्वे प्रवासादरम्यान काहीही खरेदी करायचे असल्यास त्यासाठी रोख रक्कमच बहुतेक वेळा द्यावी लागते. अशावेळी खिशात रोख रक्कम नसेल, तर प्रवाशांची मोठी अडचण होते. पण आता प्रवाशांची ही अडचण होणार नाही. कारण भारतीय रेल्वेनं थेट धावत्या रेल्वेमध्येच एटीएमद्वारे पैसे काढण्याची सुविधा प्रवाशांसाठी उपलब्ध करून दिली आहे.

भारतातला पहिला प्रयोग!

धावत्या ट्रेनमध्येच एटीएमचं मशीन बसवून त्या माध्यमातून प्रवाशांना आपल्या खात्यातून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचा हा देशभरातला पहिला प्रयोग आहे. अशा प्रकारचं पहिलं एटीएम महाराष्ट्रामधील मनमाड ते मुंबई दरम्यान प्रवासी वाहतूक करणाऱ्या पंचवटी एक्स्प्रेसमध्ये बसवण्यात आलं आहे. दररोज या ट्रेननं हजारो मुंबईकर व नाशिक-मनमाडकर ये-जा करीत असतात. आता या प्रवासादरम्यान प्रवाशांना '. दररोज या ट्रेननं हजारो मुंबईकर व नाशिककर ये-जा करत असतात. आता या प्रवासादरम्यान प्रवाशांना थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.

कधी झाली चाचणी ?

मंगळवारी सकाळी ही चाचणी घेण्यात आली. पंचवटी एक्स्प्रेसच्या वातानुकूलित डब्यामध्ये हे एटीएम बसवण्यात आलं आहे. रेल्वे अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, धावत्या ट्रेनमध्ये एटीएममधून पैसे काढण्याची ही चाचणी यशस्वी झाली आहे. इगतपुरी ते कसारा या दरम्यानच्या पट्ट्यामध्ये नेटवर्कची समस्या येत असल्यामुळे तेवढा भाग वगळता इतर वेळी एटीएममधून विनासायास पैसे काढता येत असल्याचं चाचणीतून स्पष्ट झालं आहे.

रेल्वे व बँकेचा संयुक्त उपक्रम

नॉन फेअर रेव्हेन्यू आयडिया स्कीम उपक्रमांतर्गत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. भुसावळ रेल्वे विभाग आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांनी संयुक्तपणे ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे. पंचवटी एक्स्प्रेसच्या सर्व डब्यांमधील प्रवाशांना या एटीएमचा वापर करून पैसे काढता येणार आहेत.

त्याशिवाय, या रेल्वेचे डबे पुढे मुंबई-हिंगोली जनशताब्दी एक्स्प्रेसला देखील जोडले जाणार असल्याचे समजतेय. त्यामुळे त्या ट्रेनमध्येही ही सुविधा वापरण्यासाठी उपलब्ध होणार आहे.

आरबीआयची एटीएम इंटरचेंज शुल्क वाढीस मंजुरी; दैनंदिन व्यवहारांवर काय होणार परिणाम?

?आता या एटीएम सुविधेचा वापर कसा केला जाईल, हे कालांतराने आढावा घेतल्यानंतर समजून येणार आहेच. त्यानंतरच समजून येईल की, ही सुविधा भविष्यात इतर रेल्वे गाड्यांमध्येही ही सेवा उपलब्ध करून देणे, हा रेल्वे प्रशासनाचा मानस आहे. या एटीएमच्या सुरक्षेसाठी २४ तास सीसीटीव्हीची निगराणी ठेवण्यात येणार आहे. किंबहुना त्यासाठीच एटीएम मशीन व त्याला पुरक अशा सर्व मशीन कक्षांनाही स्वतंत्ररित्या शटर बसवण्यात आलेले आहेत. एसी कोणाच्या बाजूलाच ही सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. भारतात पहिल्यांदाच सुरु करण्यात आलेला हा उपक्रम निश्चितच फलदायी ठरला जाईल, अशी खात्री अखिल भारतीय रेल्वे प्रवासी महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय कराळे यांनी व्यक्त केली आहे.

धामणीतील काळूबाई व तुळजाभवानी मंदिरात चोरी

लोणी-धामणी ■ कैलास गायकवाड

लोणी -धामणी : धामणी (ता. आंबेगाव) या गावचे हद्दीत हिवरकरमळा येथील काळुबाई माता व तुळजाभवानी माता मंदिरात पाच दिवसापूर्वी चोरट्यांनी काळुबाई माता व तुळजाभवानी माता मंदिरांचे लोखंडी दरवाजांचे कडीकोयंडे तोडुन मंदिरातील काळुबाई, तुळजाभवानी मंदिरातून वीस हजार रुपये किमतीचे काळुबाई देवीचे पाच ग्रॉम वाजनाचे सोन्याचे दोन वाट्या व चार मोठे मनी असलेले मनी मंगळसुत्र, सोळा हजार रूपये किमतीचे तुळजाभवानी देवीचे चार ग्रॅम वजनाचे चार सोन्याचे मनी असलेली काळया मन्यांची पोथ , आठ हजार रुपये किमतीचे काळुबाईचे लहान मुर्तीचे दोन ग्रॅम वजनाचे दोन सोन्याचे मनी असलेली काळया मन्यांची पोथ, चार हजार रूपये किमतीच्या चारशे ग्रॅम वजनाच्या काळुबाई माता मंदिरामधील चांदीच्या पादुका, चार हजार रुपये किमतीच्या चारशे ग्रॅम वजनाच्या तुळजाभवानी माता मंदिरामधील चांदीच्या पादुका, चार हजार रुपये रोख रक्कम दोन्ही मंदिराचे दान पेटयांमधील त्यात वेगवेगळ्या चलणी नोटा व नाणी असे मिळून ५६००० / हजार रुपयांची चोरी चोरट्यांनी केल्याचे पारगाव पोलीसांनी सांगितले. या संदर्भफात चोरी झाल्याची फिर्याद- शंकर सखाराम हिवरकर यांनी केली आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारी वरून अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पारगाव पोलीस स्टेशनचे सहा. पोलिस निरीक्षक नेताजी गंधारे यांच्या मार्गदर्शानाखाली पोलिस उपनिरीक्षक शरद घोडके व ठाणे अंमलदार नरेंद्र गोराणे हे करीत आहे.

शेतरस्त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सस्ती अदालत उपक्रम राबविणार : विभागीय आयुक्त दिलीप गावडे

छ.संभाजीनगर ■ वसंत आवटे

'संवाद मराठवाड्याशी' उपक्रमांतर्गत विभागीय आयुक्तांचा थेट शेतकऱ्यांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे संवाद;शिव रस्ते, पाणंद रस्ते याबाबत आठही जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मांडल्या अडचणी;तालुका पातळीवर दर पंधरवाड्याला सस्ती अदालत घेण्याचे निर्देश



छत्रपती संभाजीनगरः शेतकरी बांधवांसाठी आपल्या शेतात जाण्यायेण्यासाठी शेतरस्ता, पाणंद रस्ता अत्यंत महत्वाचे असतात. गावनकाशाप्रमाणे अतिक्रमित व बंद झालेले शेत रस्ते, पाणंद रस्ते मोकळे करुन देण्यासाठी तालुका पातळीवर सस्ती अदालत उपक्रम राबविण्याचे निर्देश आज विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी दिले. शेतकरी बांधवांनी शेतरस्ते मोकळे देण्यासाठीच्या या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा असे आवाहनही त्यांनी केले. मराठवाडा विभागातील आठही जिल्ह्यातील नागरिक आपल्या शेतातील जाण्या-येण्याच्या रस्त्याबाबत अडचणी घेऊन विभागीय आयुक्त कार्यालयात प्रशासकीय अधिकारी यांच्या भेटीसाठी, निवेदने देण्यासाठी येतात. मात्र विभागीय पातळीवरील अधिकारी अनेकदा कामानिमित्त दौऱ्यावर किंवा अन्य कामामुळे त्यांची भेट होत नाही, हीच बाब विचारात घेत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी शेतकऱ्यांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे थेट संवाद साधण्यासाठीचा उपक्रम हाती घेतला आहे. आज शेतरस्ते शिव रस्ते, पाणंद रस्ते याबाबत विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी संवाद साधला. यावेळी अपर आयुक्त बाबासाहेब बेलदार, अपर आयुक्त के.आर.परदेशी, उपजिल्हाधिकारी उमाकांत पारधी, उपजिल्हाधिकारी शुभांगी आंधळे यांच्यासह संबंधित निवासी उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्री.गावडे म्हणाले, जे रस्ते अस्तित्वात आहेत त्यांना क्रमांक देण्यात यावेत. शेतजमिनीमध्ये वहिवाट करण्यासाठी अस्तित्वात असलेले रस्ते काही ठिकाणी अरुंद आहेत. अशा ठिकाणी मोठी वाहने जाण्यास अडचण निर्माण होऊन तक्रारही होतात. सर्वच शिवपाणंद आणि शेतरस्त्यांची हद्द निश्चित करून त्यांची कामे दर्जेदाररीत्या पूर्ण करावी, शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर महसूल प्रशासनामार्फत योग्य ती कार्यवाही करावी, शेत वहिवाट रस्त्याची तक्रार सुनावणी तहसीलदार यांच्याकडे होते. अशी रस्त्यांबाबत प्रलंबित असलेली प्रकरणे एका महिन्यात निकाली काढावीत. असे स्पष्ट आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यांनी यापूर्वीच दिले आहेत. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेणे, त्यांचे निराकरण करण्यासाठी विभागातील सर्व निवासी उप जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांशी या वेबिनारच्या माध्यमातून चर्चा आणि अडचणीचे निराकरण करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

संभाजीनगर जिल्ह्यातील ईसारवाडी ता.पैठण येथील शेतकऱ्यांनी शेतरस्त्याबाबत आपली अडचण मांडली. विशाल घुले यांनीही पाणंद रस्त्याची समस्या बोलून दाखविली. वायगाव ता.पैठण येथील बबन बोबडे यांनी शेतरस्त्यासाठी प्रशासनाने मदत करावी अशी अपेक्षा व्यक्त केली. वैजापूर तालुक्यातून विपीन काळे यांनी गावात गावनकाशा ठळक स्वरुपात लावला तर गावातील शेतरस्ते मोकळे होण्यास मदत होईल, तसेच गट मोजणी करून हद्द निश्चित करावी अशी मागणी केली. याबाबत विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी श्री.काळे यांनी मांडलेली कल्पना निश्चितपणे चांगली असल्याचा उल्लेख केला. यामुळे शेतरस्ते, पाणंद रस्ते मोकळे होतील, संबंधित तालुका प्रशासनाने याबाबत कार्यवाही करावी तसेच नवीन रस्ते गावनकाशात समाविष्ठ करण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवावा, विभागीय आयुक्त कार्यालयाकडून धोरणात्मक निर्णयासाठी राज्याच्या जमाबंदी विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल असेही श्री.गावडे म्हणाले. लातूर जिल्ह्यातून रामेश्वर शेटे, सुदर्शन पाटील, बळीराम पाटील, एकनाथ पांढरे यांनी शेतरस्त्याच्या अडचणी मांडल्या. याबाबत जिल्हा प्रशासनाने मोहिम स्वरुपात कालबद्ध कार्यक्रम राबवावा तसेच तालुका पातळीवर सस्ती अदालत उपक्रमाचे तातडीने नियोजन करावे. असे निर्देश विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी दिले.

नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथून भारत परबते यांनी पाणंद रस्ते, अतिक्रमणाबाबत आपली अडचण सांगितली. तसेच इतर शेतकऱ्यांनीही शेतरस्त्याबाबतच्या आपल्या अडचणी विषद केल्या. हिंगोली जिल्ह्यातील अविनाश नरवडे यांनी शेतरस्ते अतिक्रमणाचा विषय सांगितला. याबाबत गरज तपासून पोलीस बंदोबस्तात रस्ता मोकळा करावा असे निर्देश दिले. विनोद राठोड यांनी पिंपळवंडी रस्त्याचा प्रश्न मांडला. त्यांच्यासह जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी चर्चेत सहभाग घेतला. जालना जिल्ह्यातील बदनापूर येथून लक्ष्मण कुऱ्हाडे यांनी चर्चेत सहभाग घेतला. आमच्या गावात पाणंद रस्ते नाहीत, गेल्या अनेक वर्षापासून आमचा यासाठी प्रयत्न सुरू आहे. शेतात जाण्यायेण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. श्री.कुऱ्हाडे यांच्या अडचणीबाबत विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी जालना जिल्हा प्रशासनाने हा विषय मार्गी लावून यासोबतच इतर शेतकरी बांधवांचाही प्रश्न मार्गी लावण्यासाठी तातडीने सस्ती अदालतीचे आयोजन करावे असे निर्देश दिले. बीड जिल्ह्यातील शिरुर कासार, गेवराई येथील शेतकरी बांधवांनी आपल्या शेतरस्त्यांसंदर्भातील अडचणी मांडल्या. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी श्री.स्वामी यांनी शेत रस्ते मोकळे करण्यासाठी बीड जिल्हा प्रशासनाने केलेल्या नियोजनाबाबत माहिती दिली.

धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव, तुळजापूर, उमरगा येथून शेतकऱ्यांनी चर्चेत सहभाग घेतला. परभणी जिल्ह्यातूनही अनेक शेतकऱ्यांनी शेतरस्ते, पाणंद रस्ते याबाबतच्या समस्या मांडल्या. याबाबत लवकरच सस्ती अदालत उपक्रम हाती घेणार असल्याचे जिल्हा प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले. शेतरस्ते, पाणंद रस्ते बाबतच्या या संवादात मराठवाड्याच्या आठही जिल्ह्यातून संवाद साधण्यासाठी मोठ्या संख्येने शेतकरी चर्चेत सहभागी झाले होते. विभागीय पातळीवरुन ज्या शेतकऱ्यांशी आज संवाद होऊ शकला नाही त्या शेतकरी बांधवांशी संबंधित जिल्हा, तालुका प्रशासनाने सस्ती अदालतीच्या माध्यमातून संवाद साधून त्यांचे शेत रस्त्यांचे प्रश्न तत्परतेने मार्गी लावावेत असे निर्देश विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी दिले. अपर आयुक्त बाबासाहेब बेलदार यांनी शेतरस्ते व त्याबाबतच्या कायद्याबाबत माहिती दिली. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील जिल्हा व तालुका प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांनी या संवाद कार्यक्रमात सहभाग घेतला.

चंदन नगर मध्ये २० एप्रिलला मोफत मराठा वधू वर मेळावा शिरूर तालुका मित्रपरिवार पुणे व मराठा सोयरीक संस्थेचा उपक्रम

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर



(पुणे) वाघोली : शिरूर तालुका मित्रपरिवार पुणे व मराठा सोयरीक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यातील चंदननगर मध्ये मोफत ९७ वा मराठा वधू वर परिचय मेळावा मेळावा आयोजित केला आहे हा मेळावा रविवार दिनांक २० एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता चंदननगर येथील जुन्या भाजी मंडईत मनपा शाळेच्या हॉलमध्ये होणार आहे. तसेच पुढील ९८ वा मोफत मेळावा हा आळंदी शहरातील ज्ञानसागर मंगल कार्यालयामध्ये रविवार दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता होणार असल्याची माहिती शिरूर तालुका मित्र परिवाराचे अध्यक्ष बाळा पऱ्हाड व संस्थेचे अध्यक्ष अशोक पांडुरंग कुटे यांनी दिली आहे.

हे सर्व मेळावे मोफत असून वधू-वरांनी आपल्या पालकांसोबत आधार कार्ड झेरॉक्स व बायोडाटा घेऊन येणे बंधनकारक आहे. पदवीधर, उच्चशिक्षित, अविवाहित, घटस्फोटीत, विधुर, विधवा यांच्यासाठी हा मेळावा आहे. मेळाव्यामध्ये विविध भागातील अनेक चांगली सुंदर स्थळे समक्ष बघायला मिळणार आहेत. आतापर्यंत संस्थेमार्फत ४५०० लग्न जमले आहेत त्यातील ५५० लग्न हे एकल विधुर विधवा यांची जमली आहेत. अधिक माहितीसाठी संपर्क ७०२०२८१२८२ यावर करण्याचे आवाहन केले आहे. संस्थेची अहिल्यानगर, पुणे, नाशिक या तीन ठिकाणी शाखा आहेत.

मानसिक त्रासाला कंटाळून शिक्षकाची आत्महत्या; परभणी ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्ह्याची नोंद

परभणी ■ वसंत आवटे

शाळेच्या संच मान्यतेसाठी सतत पैशाची मागणी करून मानसिक त्रास दिल्याप्रकरणी ३५ वर्षीय शिक्षकाने तालुक्यातील पेडगाव शिवारात गुरुवार (दि.१७) सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली.या विषयी अधिक माहिती अशी की, मृत सोपान उत्तमराव पालवे (वय ३५ वर्ष, रा. आडगाव दराडे ता. सेलू ह.मु. विकासनगर परभणी) हे श्री नृसिंह प्राथमिक शाळा मंगरूळ ता. मानवत येथे मागील काही वर्षापासून शिक्षक म्हणून कार्यरत होते. शिक्षक म्हणून रुजु करण्यासाठी संस्थेचे सचिव बळवंत मधुकर खळीकर यांनी २० लाख रूपये घेवून सुध्दा पुन्हा संच मान्यतेसाठी ५ लाख रूपयांची सतत मागणी केली. त्यामुळे या मागणीस कंटाळून मानसिक त्रास दिल्याप्रकरणी शिक्षक सोपान पालवे यांनी पेडगाव शिवारात लिंबाच्या झाडाला दोरीने गळफास घेवून आत्महत्या केली. याप्रकरणी मृत शिक्षकाच्या पत्नी सागर सोपानराव पालवे यांनी परभणी ग्रामीण पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यावरून आरोपी विरूध्द भारतीय न्याय संहिता कायद्यानुसार आरोपी विरूध्द गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान गुरुवार (दि.१७) दुपारी पोलिस निरीक्षक डोंगरे, सहायक पोलिस निरीक्षक हराळे, पोलिस उपनिरीक्षक तावडे, सहायक पोलिस उपनिरीक्षक कनाके यांनी घटनास्थळी भेट दिली.या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक तावडे हे करीत आहेत.

राज्यात किक बॉक्सिंग खेळास प्रोत्साहान देत प्रत्येक जिल्ह्यातून राज्यस्तरीय पंच घडवणार :निलेश शेलार



दै, जनप्रभात टाकळी हाजी प्रतिनिधी ■ शेख शौकत

टाकळी हाजी (पुणे): किक बॉक्सिंग असोसिएशन महाराष्ट्र यांच्या वतीने राज्यस्तरीय पंच प्रशिक्षण शिबीर पुणे येथे नुकतेच संपन्न झाले.यात राज्यातील १२५ पंचांनी सहभाग घेतला होता.

हे शिबीर आंतरराष्ट्रीय रेफ्री,वाको इंडिया चे चीफ रेफ्री तथा महाराष्ट्राचे वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. सूर्यप्रकाश मुंडपात यांचे मार्गदर्शन लाभले. आंतरराष्ट्रीय रेफ्री शिवानी राजहंस, प्रशांत कांबळे,मकरंद जोशी यांनी सर्व पंचांना किक बॉक्सिंग खेळाचे सर्व इव्हेंटच्या नियमांचे मार्गदर्शन केले.किक बॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष निलेश शेलार यांनी राज्यातील शहर नव्हे तर ग्रामीण भागात खेळास प्रोत्साहान देत खेळाडू तयार करून देशाचे नाव उंचावणार असुन प्रत्येक जिल्ह्यातुन राज्यस्तरीय पंच घडवणार आसल्याचे सांगत उपस्थित पंच,मार्गदर्शकाचे आभार मानले.

शिबीरासाठी महाराष्ट्राचे टेक्निकल कमिटीचे चेअरमन श्री.सतीश उपाध्यक्ष कृष्णा ढोबळे यांचे विशेष सहकार्य केले.सचिव धीरज वाघमारे सर यांनी शिबीरा दरम्यान सर्व पंचाना मार्गदर्शन करत प्रोत्साहित केले.

लळा या कथेचा राज्यस्तरीय कथालेखन स्पर्धेत पहिला क्रमांक

वाई ■ प्रशांत थोरवे



वाई : रेणुका आर्टस आयोजित राज्यस्तरीय कथालेखन २०२५ या स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त झाल्याबद्दल प्रा. संभाजी रामचंद्र लावंड. यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. आसावरी इंगळे यांनी कथा स्पर्धेचे आयोजन पारदर्शक पद्धतीने केले. ४९ कथाचे समग्र

परिक्षण प्रसिद्ध जेष्ठ साहित्यिक श्रीमती ज्योती पुजारी यांनी तौलनिक अभ्यास करुन पाच कलाकृतींना योग्य न्याय देऊन जीवंत केल्या. त्यांनी पाच लेखकांच्या साहित्यकलाकृतीचे केलेले मुल्यमापन हे त्यांच्या अनुभवाचे समग्र फलित आहे,या स्पर्धेतील प्रथम क्रमांकांची कथा आहे 'लळा'. कथा लेखक आहेत. प्रा. संभाजी रामचंद्र लावंड शेळीवरच्या माणसाच्या प्रेमाची ही कथा आहे ही नुसती कथा नाही तर लेखकाचा शेळीबरोबरच्या नात्याचा हा प्रवास आहे. कथेच्या सुरवातीला लेखकाने शेळीचे वर्णन केले आहे ते वाचताना ती शेळी आपल्या डोळ्या समोर येते. कथेत वातावरणातील बदल टिपणारी नेमकी वाक्ये आहेत जशी 'कोवळ्या उन्हात माळाला काविळ झाल्यासारख

वाटायच. अशी छोटी छोटी वाक्ये पेरत कथेचा ओघ पुढे वहात रहातो, निसर्गातले बदल टिपताना लेखक त्याच्या शेळीचेही गुण सांगत जातो. कथेचा ओघ कुठही संथ होत नाही. कथेचा शेवट खूप वेळ मनात रंगाळत राहतो. अतिशय उत्तम कथा आहे. या बद्दल सन्मान पत्रा सोबत र. ७५० धन राशी देण्यात आली आहे.ही कथा लेखकाने 'वलाफोक'या नव्याने प्रसिद्ध होणाऱ्या ग्रामीण कथासंग्रहात समाविष्ट केली आहे. वाचकांना तो कथासंग्रह विकत घ्यायचा असेल तर ९९२२०८०९५१ या फोनवर संवाद साधावा. लेखकाने लिहिलेल्या 'गुराखी' या ग्रामीण कथासंग्रहास सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय साहित्य भुषण पुरस्कार, साहित्य रत्न पुरस्कार आणि साहित्य प्रेरणा पुरस्कार मिळाले आहेत.

'त्या' अपघातातील गंभीर जखमीचा मृत्यु; चारठाणा पोलिसांत अज्ञाताविरूद्ध गुन्हा नोंद

परभणी ■ वसंत आवटे

जिंतुर : जालना महामार्गावरील पिंपरी गिते गांव परिसरात मंगळवार (दि० १५) रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास दुचाकीस्वारास एका अज्ञात वाहनाने धडक दिली होती. या अपघातात दुचाकीस्वार गंभीररित्या जखमी झाला होते. दरम्यान बुधवार (दि० १७)रोजी त्याचे उपचारादरम्यान त्या गंभीर जखमीचा मृत्यु झाला.

जवळा जिवाजी ता० - सेलू येथील अमोल महादेव घट (वय ४८) हा इसम दुचाकी क्रमांक एमएच - २२-एवाय-९३४६ या क्रमांकाच्या दुचाकीवरून चारठाण्याकडे येत असतांना समोरून येणाऱ्या एका वाहनाने दुचाकीस पिंपरी गावाजवळ समोरासमोर जोराची धडक दिली होती. दरम्यान अपघात घडल्यानंतर सदर वाहन चालक वाहनासह घटनास्थळावरून फरार झाला होता. या अपघातात दुचाकीस्वार गंभीररीत्या जखमी झाला होता. उपस्थित स्थानिक नागरीकांनी घटनेची मीहिती चारठाणा पोलीस व महामार्ग पोलीसांना दिली. दरम्यान या गंभीर इसमास मंठा येथे प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी जालना येथे हलविण्यात आले होते. दरम्यान जालना येथे अतिदक्षता विभागात उपचार सुरु असतांना सदर इसमाचा बुधवार रोजी मृत्यु झाला.या प्रकरणी लखन माणिकराव खरात रा.जिवाजी जवळा यांनी दिलेल्या माहिती वरून चारठाणा पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनधारकाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गोविदनगर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

दै, जनप्रभात सोयगाव प्रतिनिधी ■ भावराव मोरे



सोयगाव : सोयगाव तालुक्यातील गोविदनगर येथील भिम गर्जना मित्र मंडळाच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली..

यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा सजवलेल्या एका रथामध्ये ठेवुन प्रथम पुजन सरपंच अनिल सोळंके यांनी केले नंतर गावभर डीजे बॅन्डच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली यावेळी मडळाचे अध्यक्ष सूर्यभान पितांबर संसारे उपाध्यक्ष विशाल संसारे,अनिल संसारे, फिरोज तांबोळी, अमोल सुरेवंशी, आकाश कोतकर, रुपेश कोतकर ,अविनाश संसारे, विलास भ्रमाणे, समाधान भ्रमाणे, भुरा कोतकर ,अशोक संसारे, सोपान संसारे, आणा कोतकर, काशिनात कोतकर,. अशोक भिका संसारे ,बाळू भिका संसारे , सुनील पितांबर संसारे ,रहीम कासम, समाधान संसारे, गौतम साथदिवे, अविनाश जोहरे, अनिल मोरे, फकिरा कोतकर, विकास संसारे ,राहुल कोतकर ,इंदर कोतकर, नारायण संसारे. ,आदी उपस्थित होते यावेळी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी अनिल संसारे यांनी माहीती सागितली तर कार्यक्रमाला चे नियोजन विशाल संसारे यांनी केले होते.

शिरूर नगरपरिषदेचे ठेकेदार अडचणीत! म्हाडाच्या जमिनीवर मुरूम उत्खनन प्रकरण

रांजणगाव गणपती प्रतिनिधी बाळासाहेब कुंभार



रांजणगाव गणपतीः शिरूर नगरपरिषदेच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा प्रकार उघडकीस आला आहे. मौजे शिरूर, गट क्रमांक ११४३/ब मधील म्हाडाच्या मालकीच्या १ हेक्टर ६४ आर क्षेत्रावर तब्बल १५०० ब्रास मुरूमचे अनधिकृत उत्खनन शिरूर नगरपरिषदेचे घनकचरा ठेकेदार / निविदाधारक यांनीं केले आहे. ही माती शिरूर नगरपरिषदेच्या घनकचरा डेपोच्या कामासाठी वापरल्याचा ठपका तहसीलदारांनी ठेवला असून, यासाठी नगरपरिषद व ठेकेदारावर ८८,५०,१०५ रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

दि.२२ डिसेंबर २०२० रोजी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी पंचनामा करून ही कारवाई नोंदवली. तपासात निष्पन्न झाले की, नगरपरिषदे च्या ठेकेदारकडून मुरूम उपसून कचरा डेपोच्या कामासाठी वापरण्यात आला. याशिवाय, उत्खनन केलेला मुरूम सुरक्षा भिंतीजवळ टाकून सपाटीकरणासाठी वापरण्यात आला आहे.

म्हाडाच्या जमिनीत कोणतेही काम केले नसल्याचे नगरपरिषदेकडून लेखी खुलासा देवून स्पष्ट केले असून, सर्व बांधकामे स्वतःच्या मालकीच्या जमिनीवरच केल्याचा दावा नगरपरिषदेने केला आहे.म्हाडाने मात्र उलट भूमिका घेत, नगरपरिषदेने त्यांच्या जागेतच उत्खनन केल्याचे स्पष्ट केले आहे.

तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी ठेकेदाराने जर दंडाची रक्कम १५ दिवसांत भरली नाही, तर ती शिरूर नगरपरिषदेकडून वसूल करून शासनाच्या खात्यात भरावी. अन्यथा संबंधित मिळकतीवर बोजा दाखल करून कारवाई करण्यात येईल. असा आदेश दिला आहे.

या प्रकरणामुळे शिरूर नगरपरिषदेच्या कारभारावर संशयाचे सावट निर्माण झाले असून, महसूल नियमांचा भंग केल्यामुळे पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेने कायद्याचे पालन करून कामे करणे आवश्यक असल्याचे या प्रकरणातून दिसून येत येत आहे . याप्रकरणी शिरूर मनसेचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष

महिबूब सय्यद, शिरूर प्रवासी संघ अध्यक्ष अनिल तात्या बांडे , मनसेचे तालुका संघटक अविनाश घोगरे ,सचिव रवी लेंडे, शहराध्यक्ष आदित्य मैड यांनी याबाबत लेखी पत्र व्यवहार करून वेळोवेळी पाठपुरावा केला होता.

कोल्ड्रिंक पिताय? , तर वेळीच सावध व्हा , डॉक्टरांनी दिला इशारा

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर



(पुणे) वाघोली : उन्हाळा तापत चाललेला असताना अनेक जण तहान भागवण्यासाठी थेट कोल्ड्रिंक पिताना दिसतात. थंडावा मिळवण्यासाठी हे सर्रासपणे केलं जात असलं, तरी ही सवय तुमच्या आरोग्यासाठी घातक ठरू शकते, असा इशारा डॉक्टरांनी दिला आहे.उन्हाच्या तीव्रतेत शरीराला सतत पाण्याची गरज असते. अनेकदा शेतात काम करताना, प्रवासात किंवा बाहेर असताना पाण्याऐवजी लोक कोल्ड्रिंकला पर्याय मानतात, पण ही मोठी चूक आहे. कोल्ड्रिंक तात्पुरती तहान भागवते, पण काही वेळातच ती तहान पुन्हा वाढवते, असं डॉक्टर सांगतात.

कोल्ड्रिंक्समध्ये असणारा साखरेचा आणि केमिकल्सचा अतिरेक शरीरातील पाणी शोषून घेतो. यामुळे शरीर हायड्रेट होण्याऐवजी डिहायड्रेट होऊ शकतं. शिवाय वारंवार कोल्ड्रिंक पिल्यास पचनसंस्था, लिव्हर आणि हृदयावरही परिणाम होतो.

विशेषतः लहान मुलं आणि वृद्ध व्यक्तींनी कोल्ड्रिंकपासून पूर्णपणे दूर राहिलं पाहिजे. त्याऐवजी नैसर्गिक आणि पोषणमूल्य असणारे पदार्थ निवडावेत.

- डॉ. ज्योती जाधव, वाघोली, पुणे.

उन्हाळ्यात प्रत्येकाने किमान ८ ते १० ग्लास पाणी दररोज पिण्याची सवय ठेवावी. याशिवाय नैसर्गिक द्रवांचे सेवन वाढवावे. तहान लागली की लगेच कोल्ड्रिंकचा विचार करणं टाळावं. तसेच उन्हाळ्यात शरीराचं तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी, आरोग्य चांगलं राहण्यासाठी हायड्रेशन अत्यंत आवश्यक आहे.

- डॉ. कपिल जुमले, वाघोली, पुणे.

पोलीस स्टेशन हिंगणघाट जिल्हा वर्धा बसस्टॉप वर गर्दीचा फायदा घेवून दागिने व पैसे चोरी करणारी महिला हिंगणघाट पोलीसांच्या जाळयात

हिंगणघाट ■ प्रतिनिधी



पोलीस स्टेशन हिंगणघाट येथे फिर्यादी नामे श्रीमती वच्छला गोपालराव बोरधरे वय ६५ वर्ष रा.वार्ड क्र.०६ बुटटीबोरी जि.नागपुर यांनी तोंडी रिपोर्ट दिली की, दि. १४/०४/२०२५ चे ११.३० वा दरम्यान फिर्यादी ही वाढदिवसाकरीता बुटटीबोरी येथुन हिंगणघाट येथे येत असताना हिंगणघाट येथील नंदोरी चौकात बसमधुन उतरत असताना फिर्यादी ही टिकीटचे पैसे घेण्यासाठी टिकीट काढण्याकरीता बॅगमधे टिकीट काढायला लागली असता तिला बॅगमधे असलेले दोन लहान पर्समधील १)सोन्याची पोत अंदाजे ०३ तोळे वजनाची कि २,१०,०००रू २)तीन तोळे सोन्याचा पोहेहार कि.२,१०,००० रू.३) रोख ५००० रू. एकुन जु.कि.४,२५,००० रू.दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून अज्ञात आरोपीविरूध्द सदरचा गुन्हा नोंद असून सदर गुन्हयांतील आरोपी शोध कामी मा. अनुराग जैन, पोलीस अधीक्षक सा. वर्धा, मा.डॉ.सागरकुमार कवडे अप्पर पोलीस अधीक्षक सा. वर्धा यांच्या मार्गदर्शनात मा.रोशन पंडीत, उपविभागीय पोलीस अधीकारी सा, हिंगणघाट व मा. देवेंद्र ठाकुर, पोलीस निरीक्षक सा. हिंगणघाट यांचे आदेशाने पोलीस स्टेशन हिंगणघाट येथील डि.बी. पथकाचे इंचार्ज पोउपनि भारत वर्मा, पोलीस हवालदार प्रशांत ठोबरे बक्र १२३४,पोहवा/१२९१ यशवंत गोल्हर, पो.हवा/७४६ विनोद बुरीले,पो.ना राहुल साठे बक्र ८५९, पोना/१४९७ राकेश आष्टनकर, पोना/१४९० विकास अवचट,पोना/६०६ नरेंद्र आरकेर, पोना/१५१४ विशाल बंगाले, पोशि/१८७ आशिष नेवारे, पोशि/७९४ मंगेश वाघमारे, महिला पोलीस अंमलदार/६५९ सुषमा कावळे हे त्याचे पथकासह फिर्यादीने सांगितलेल्या वर्णनाचे बाईचा पोस्टे परिसरात पेट्रेलिंग करीत असता शोध घेतला असता नंदूरी चौक, हिंगणघाट येथे एक महिला लहान मुलांसह संशयीत रित्या फिरतांनी मिळून आल्याने तिला महिला पोलीस अंमलदार/६५९ सुषमा कावळे हिचे मदतीने ताब्यात घेवून तिला तिचे नाव, पत्ता विचारले असता तिने तिचे नाव सौ. दिपा अनिल लोंढे वय २३ वर्ष रा. रहाटे नगर टोली, व्हीटीस पार्वती नगर, पोस्ट पार्वती नगर, ता. जि. नागपूर असे सांगितल्याने हिला ताब्यात घेवून तिचे जवळ असलेल्या हॅन्डबॅगची पाहणी केली असता तिचे हॅन्डबॅग मध्ये हिरव्या रंगाचे छोटी कापडी पिशवी मिळून आल्याने पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये १) एक पिवळसर धातू असलेली अंदाजे ३ तोळयाची पोत ज्याच कंठी, काळे मनी व गोफ असलेली किं. २,१०,००० रू २)अंदाजे ३ तोळे पिवळसर धातूची पोहेहार किं. २,१०,००० रू ३) रोख ५,००० रू असा एकुण ४,२५,००० रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला. असुन सदर गुन्हयांचा पुढील तपास हिंगणघाट पोलीस करीत आहे.

विदर्भातील युवकांसाठी सुवर्णसंधी ; अग्निवीर भरतीसाठी ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरू

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूरः भारतीय सैन्याच्या अग्निवीर भरती मेळाव्यासाठी विदर्भातील दहा जिल्ह्यांतील (बुलढाणा जिल्हा वगळून) इच्छुक उमेदवारांसाठी ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. ही नोंदणी प्रक्रिया २५ एप्रिल २०२५ पर्यंत ‍.रदग्हर्ग्र्हिर्हेस्रू.हग्म्.ग्ह या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अर्ज ऑनलाईन असून उमेदवारांना ‍.रदग्हर्ग्र्हिर्हेस्रू.हग्म्.ग्ह या पोर्टलवर जाऊन आपली नोंदणी करणे आवश्यक आहे. भरतीसाठीची लिखित परीक्षा (र्णी येत्या मे व जून २०२५ मध्ये होण्याची शक्यता आहे.

या भरतीबाबत माहिती देताना जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी आनंद पाथरकर यांनी सांगितले की, विदर्भातील युवकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. देशसेवेच्या संधीसाठी ऑनलाईन अर्ज वेळेत भरावा. विदर्भातील युवकांमध्ये देशसेवेबाबत उत्साह असून, अशा भरती प्रक्रियेमुळे त्यांना सैन्यदलात सामील होण्याची संधी प्राप्त होत आहे. बुलढाणा जिल्हा वगळता इतर सर्व जिल्ह्यांतील पात्र उमेदवारांनी लवकरात लवकर अर्ज भरावेत, असे आवाहन त्यांनी केले आहे.

मराठी गाण्यांचा कार्यक्रम 'रंग माझा वेगळा भाग-३' चे आयोजन शनिवारी



नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : स्वरानंद म्यूजिक अकादमी तर्फे मराठी संगीताचा सांस्कृतिक वारसा जोपासण्याच्या उद्देशाने सतत कार्यरत आहे. शनिवार दि. १९ एप्रील रोजी सायंकाळी ६.३० वाजता. मराठी गीतांचा अप्रितम कार्यक्रम 'रंग माझा वेगळा भाग-३' या कार्यक्रमाचे आयोजन सायंटिफिक सभागृह लक्ष्मीनगर येथे सायंकाळी साडेसहा वाजता करण्यात आले आहे. या कार्यक्रमात जुनी नवीन मराठी गीते सादर करण्याचा प्रयत्न स्वरानंद चे अध्यक्ष व नागपूरचे सुप्रसिद्ध गायक अविनाश घोंगे व स्वरानंदच्या सदस्या व आकाशवाणीची मान्यता प्राप्त गायिका सौ. राखी काटोलकर व सौ. जया महादुरे करणार आहे. हा कार्यक्रम निःशुल्क असल्याने जास्तीत जास्त मोठ्या संख्येने व नागरिकांनी याचा आस्वाद घ्यावा. असे आवाहन सचिव देवेंद्र काटोलकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

महिला लोकशाही दिन सोमवारी

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : महिला लोकशाही दिन २१ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने जिल्हास्तरावर उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात येणार आहे. अर्ज विहीत नमुन्यात असावा. तक्रार अर्ज दोन प्रतीत सादर करावा. तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे असावे. न्यायप्रविष्ठ प्रकरणे, विहीत नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती जोडलेला अर्ज, सेवा विषयक, आस्थापना विषयक बाबी, तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे नसेल तर अशा प्रकारचे अर्ज महिला लोकशाही दिनासाठी स्वीकृत करण्यात येणार नाही.

तलावात बुडण्यापासून वाचण्याकरिता आपत्ती व्यवस्थापन विभागाचे रिमोट कंट्रोल वॉटर क्राफ्ट; मकरधोकडा तलावात आपत्ती व्यवस्थापन विभागाचा प्रायोगिक उपक्रम

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : जिल्ह्यातील विविध तलाव व धरणे पावसाळ्यात पाण्याने भरल्यामुळे पर्यटकांसाठी आकर्षण ठरतात. मात्र, याच ठिकाणी नागरिकांकडून होणाऱ्या धाडसी कृतीमुळे दुर्घटनांची शक्यता वाढते आणि दरवर्षी अनेक दुर्दैवी घटना घडतात. ऑगस्ट २०२४ मध्ये मकरधोकडा तलावात एका युवकाचा अशाच प्रकारे मृत्यू झाल्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या संकल्पनेतून आणि निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे यांच्या मार्गदर्शनात आपत्ती व्यवस्थापन विभागाने मकरधोकडा तलावासाठी रिमोट कंट्रोल वॉटर क्राफ्ट खरेदी केला आहे.

हा एक प्रकारचा रिमोटने चालणारा वॉटर क्राफ्ट असून बुडणाऱ्या व्यक्तीला जलद मदत पोहोचवण्याचे कार्य करतो. पावसाळ्यात या क्राफ्टसह मनुष्यबळ तैनात ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी स्थानिक ग्रामपंचायतीतील दोन युवकांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले असून त्यांना संबंधित कंपनीकडून मानधनही दिले जाणार आहे.

ग्रामपंचायत मकरधोकडा यांच्याकडे हे क्राफ्ट सुपूर्त करण्यात आले असून ९ एप्रिल रोजी त्याचे प्रात्यक्षिक व तपासणी मकरधोकडा तलाव परिसरात पार पडली. या वेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी अंकुश गावंडे, नायब तहसीलदार श्री. वाडे यांच्यासह स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते. हा पायलट प्रकल्प यशस्वी झाल्यास जिल्ह्यातील अन्य जलाशयांमध्येही अशा तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा जिल्हा प्रशासनाचा मानस आहे.

४ दिवसीय (७५ तास) अखंड गायनाद्वारे होणार विश्वविक्रमाचा प्रयत्न; १९ एप्रिल ते २२ एप्रिल पर्यंत चालणार कार्यक्रम

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : परमपूज्य डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त ' हमारा संविधान, हमारा स्वाभिमान ' या शीर्षकाखाली मनीष पाटील फाऊंडेशन यांच्या विद्यमाने वरिष्ठ कलाकारांचा ४ दिवसीय संगीतमय विश्वविक्रम कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. १९ एप्रिल पासून सुरू होणारा हा कार्यक्रम २२ एप्रिल पर्यंत चालणार आहे. या नॉनस्टॉप ७५ तासांच्या गायनाद्वारे विश्वविक्रम करण्याचा त्यांचा मानस आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कन्व्हेंन्शन सेंटर, ३ माळा , ट्रेनिंग सेंटर , कामठी रोड, नागपूर येथे १९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता या कार्यक्रमाला सुरुवात होणार आहे, तर २२ एप्रिल रोजी दुपारी २ वाजेपर्यंत असा ७५ तास हा कार्यक्रम अखंड सुरू राहणार असून यात १७५ गायक कलाकार आपली गाणी सादर करणार आहेत . या कार्यक्रमात संविधानाचे ७५ वे वर्ष असल्यामुळे ७५ वरिष्ठांचे सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमाची संकल्पना आणि आयोजक मनीष पाटील, तर सह आयोजक अलका वाघमारे ,सतीश अलोणे तर मुख्य सहयोग अ?ंड.भगवान लोणारे यांचा असणार आहे . . कार्यक्रमात आयोजन समितीचे सदस्य, तसेच गायक कलाकार समन्वयक अंजली डब्रासे, सुनयना खाडे, वामन सोमकुंवर , सुनील हिरेखन , अनिल थकाते , ज्योत्स्ना शेटे (अमरावती), प्रभुदास फानडे (अमरावती), कल्पना नाईक (अमरावती) , नंदिनी वरघाट (अमरावती), आदींचा समावेश राहणार आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड म्युझिकल ग्रुपचे विशेष सहकार्य राहणार आहे. या कार्यक्रमात तांत्रिक बाजू जितू आणि इरफान सर बघणार आहेत. तेसच लाईव्ह चे काम विनोद अग्रवाल बघणार आहेत .

बेसा येथे हनुमान जन्मोत्सव सप्ताह संपन्न

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : बेसा येथे हनुमान मंदिर निवास सोसायटीत श्रीराम नवमी ते हनुमान जन्मोत्सवाच्या दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संगीतमय जागरण, कीर्तन भजन, पालखी सोहळा, तसेच सुंदर कांड व समाज प्रबोधनपर बाई पण भारी देवा मराठी काव्य मैफिल ऐतिहासिक व सांस्कृतिक व्यक्तिमत्वाची ओळख होण्यासाठी मोगरा फुलला हा साहित्यीक कार्यक्रम घेण्यात आला. सात दिवस चाललेले या सप्ताहाची सांगता भव्य महाप्रसादाने झाली. यादरम्यान श्रीमंत राजे मुधोजी भोसले, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते अतुल लोंढे, माजी आमदार टेकचंद सावरकर, रामटेक लोकसभा क्षेत्राचे खासदार श्यामकुमार बर्वे तसेच विधान परिषद सदस्य कृपालजी तुमाने, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट सुखदेव वंजारी यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभली. हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष गोपाल कडुकर उपाध्यक्ष अविनाश उदावंत, सचिव अनंता अतकरे, कोषाध्यक्ष मनोज चावके, सहसचिव घनश्याम शिवणकर, मनोज धोटे, बापू धोटे, दीपक गुल्हाने, संदीप येडे, दरवई गुरुजी, मुरलीधर गुबे, कामडी गुरुजी, नेमाडे काका, अवधेश ठाकूर, सोनू भय्या यादव, संतोष मेश्राम, संजय करमिलकर, विनोद काळे, धर्मशिल बोबडे, धीरज कवडे यांनी प्रयत्न केले.

प्रशासक, ग्रामसेवक, यांची गौळच्या ग्रामपंचायत येथे आंबेडकर जंयतीला दांडी. !

गौळ ■ योगेश कांबळे

गौळ : देवळी तालुक्यात सर्वञ शासकीय, निमशासकीय कार्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जंयती उत्साहात साजरी होत असताना गौळ येथील ग्रामपंचायत कार्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जंयती दिनी प्रशासक व ग्रामसेवक मात्र गैरहजर राहिल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

या ग्रामपंचायत मधे प्रशासक म्हणून नितीन सावलकर यांची नियुक्ती करण्यात आली असून प्रभारी ग्रामसेवक म्हणून घोडखांदे मॅडम यांच्याकडे कार्यभार आहे. सध्या ही ग्रामपंचायत बिन सरपंचांची असून ना येथे ग्रामसेवक उपस्थित असते ना प्रशासक उपस्थित राहत नसल्याने येथील नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागतो. पंचायत समिती देवळी येथील गटविकास अधिकारी यांचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. वास्तविक जिल्ह्य परिषद सर्कल असलेले हे अडीच हजार लोकसंख्येचे हे गाव आहे. या गावात किमान आठवड्यातुन दोनदा तरी प्रशासक यांनी ग्रामपंचायतला बसने आवश्यक असून नागरिकांची अडचण दुर करण्याचे प्रयत्न करणे आवश्यक असताना या ग्रामपंचायत मधे फक्त नावाचीच पाटी लागलेली आहे. १४ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जंयती साजरी करतांना माञ माजी उपसरपंच व ग्रामपंचायत कर्मचारी यांनीच बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण करण्यात आले. माञ जबाबदारी असलेले प्रशासक व ग्रामसेवक यांनी या कार्यक्रमात दांडी मारल्याने गावकर्यामधे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. या संदर्भात प्रशासकाचे म्हणणे जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या मोबाईलवर संपर्क होऊ शकला नसल्याने त्यांचे म्हणने कळू शकले नाही.

स्वरमधुरा द्वारा आयोजित 'एक प्यार का नगमा है ' २० एप्रिल रोजी

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : स्वरमधुरा द्वारा आयोजित 'एक प्यार का नगमा है ' या कार्यक्रमातून मनोज कुमार याना श्रद्धांजलीस्तोर हिंदी गाण्यांचा कार्यक्रम रविवार २० एप्रिल रोजी लक्ष्मीनगर, आठ रस्ता चौक, येथील सायंटिफिक सभागृह, रविवार सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रआयोजित करण्यात आला आहे. यात गायक कलाकार मनोज कुमार यांचावर आधारित सुमधूर गाणी गाऊन त्यांच्या आठवणी ला उजाळा देणार आहेत.

या कार्यक्रमाची संकल्पना व आयोजन राजेश दुरुगकर यांची असून या कार्यक्रमामध्ये सुप्रसिद्ध गायक आणि गायिका राजेश दुरुगकर , इशा रानडे , गौरी शिंदे आणि योगेंद्र रानडे हे गायक कलाकार गाणी सादर करणार आहेत. ह्या कार्यक्रमाचे निवेदनदीपा बुटी करणार आहेत तसेच या कार्यक्रमात दीपा बुटी (इदल्ही दी एदहुर्ज्री) गाण्याच्या मागची पार्श्वभूमी आणि त्यातला प्रवास याच्यावर प्रकाश टाकतील . या कार्यक्रमात वाद्यवृंदा ची साथसंगत महेंद्र ढोले व त्यांची टीम करणार आहेत .

कार्यक्रमाच्या प्रवेशिका सायंटिफिक सभागृहात १९ एप्रिल सकाळी ११ वाजे पासून मिळतील याचा रसिकांनी लाभ घेण्याचे आवाहन आयोजकां द्वारे करण्यात आले आहे.

' भंडारा काँग्रेसचे मोदी सरकारविरोधात आंदोलनः नॅशनल हेरॉल्ड प्रकरणाचा निषेध' ; 'राजकीय सूडबुद्धीने काँग्रेस नेत्यांवर कारवाई; जिल्हाध्यक्ष मोहन पंचभाई यांचा सरकारवर आरोप'

प्रतिनिधी ■ भंडारा



भंडारा - भंडारा येथे जिल्हाध्यक्ष मोहन पंचभाई यांच्या नेतृत्वाखाली त्रिमूर्ती चौकात काँग्रेसच्या वतीने मोदी सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करून आंदोलन करण्यात आले. यावेळी यांच्यासह समाजकल्याण सभापती शितल राऊत जि. प. भंडारा, जि. प. सदस्य प्रेम वणवे, जि. प. सदस्य देवा इलमे, जि. प. सदस्या अनिता भुरे, भंडारा तालुका काँग्रेस अध्यक्ष प्यारेलाल वाघमारे, लाखनी तालुका काँग्रेस अध्यक्ष योगराज झलके, विजय कापसे, धनंजय तिरपुडे, रिजवान काझी, रवि तिरपुडे, शमीम शेख, अरुण गडकरी, भाऊ कातोरे, पृथ्वीराज तांडेकर, चंदू कावळे, विपिन बोरकर, उदाराम भावते, विजय शहारे, शैलेश पडोळे, योगेश गायधने, साहिल मेश्राम, हेमंत बडवाईक, राधे भोंगडे, दिलीप कोटवानी, बिट्टू सुखदेवे तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

भाजपा सरकारच्या विरोधात निर्भिडपणे उभे राहणाऱ्या काँग्रेसच्या देशभरातील नेत्यांवर मोदी सरकार कारवाई करत आहे. काँग्रेस नेत्यांवर खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत. काँग्रेस नेत्या सोनियाजी गांधी व खासदार राहुलजी गांधी यांच्यावर राजकीय सुडबुद्धीने ईडीची कारवाई करण्यात आली असून त्यांना नाहक त्रास दिला जात आहे. याआधीही ईडीने सोनियाजी व राहुलजी यांची चौकशी केली आहे. काँग्रेस पक्ष ईडी, सीबीआयच्या कारवायांना घाबरत नाही. काँग्रेसचा प्रत्येक कार्यकर्ता एकजूट होऊन या कारवाईचा निषेध करेल, असे जिल्हाध्यक्ष मोहन पंचभाई यांनी सांगितले.

१९३७ सालामध्ये पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या पुढाकाराने १९१३ सालच्या कंपनी कायद्यानुसार 'असोसिएटेड जर्नल लिमिटेड'(ए्ह) नावाची एक कंपनी स्थापन करण्यात आली.

ए्ह कंपनीच्या स्थापनेनंतर सदर कंपनीतर्फे इंग्रजी भाषेमध्ये 'नॅशनल हेरॉल्ड', हिंदी भाषेमध्ये 'नवजीवन' व, उर्दु भाषेमध्ये 'कौमी आवाज' अशा शिर्षकांची दैनिके प्रकाशित होवू लागली.

सदरील दैनिकांमधून काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वामध्ये लढला जात असलेला आपल्या भारत देशाचा स्वातंत्र्यलढा व, ब्रिटिश सत्तेला विरोध याबाबतची वृत्ते प्रामुख्याने प्रकाशित होवू लागली. ही दैनिके एकप्रकारे स्वातंत्र्यलढ्याची मुखपत्रेच होती. त्यामुळे, ब्रिटिश सत्ता ह्या प्रकाशनाच्या विरोधात होती; त्यावेळी ह्या सर्व वृत्तपत्रांवर एकदा ब्रिटिशांनी बंदीदेखील आणली होती.

असा गौरवशाली इतिहास असलेल्या नॅशनल हेरॉल्ड दैनिकाला सध्याचे काँग्रेसद्वेषी सरकार बदनाम करणार नाही तर, दुसरे काय करणार आहे? काँग्रेस पक्षाचा द्वेष करण्याचे आणि नॅशनल हेरॉल्डला बदनाम करण्याचे ह्या सरकारकडे एक मजबूत कारण आहे. ते म्हणजे, ह्या सरकारची मातृसंस्था व यांचे सर्वच पूर्वज स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेले नव्हते. यांनी आपल्या भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा अनेकवेळा विरोध देखील केलेला आहे. आज नाही तर उद्या भारतीय ज्यावेळी यांना हा प्रश्न विचारतील त्यावेळी यांच्याकडे तोंड लपविण्याशिवाय दुसरा पर्यायच शिल्लक राहणार नाही. म्हणूनच याठिकाणी ते काँग्रेस पक्षाचा द्वेष करतात व, त्याकरिता नॅशनल हेरॉल्ड दैनिकाच्या एका प्रकरणाचा ते प्रभावी हत्यार म्हणून वापर करायला लागलेले आहेत.

पण, हे हत्यार असत्यावर आधारित असल्याने पूर्णपणे बोथट आहे. व, त्यांच्या ह्या बोथट अशा हत्याराने काँग्रेस पक्षाचे किंवा काँग्रेस पक्षाच्या नेत्यांचे इथे काहीच नुकसान होणार नाही.

ए्ह कंपनीतर्फे प्रकाशित होणारी आणि, वर उल्लेख केलेली सर्वच दैनिके स्वातंत्र्यानंतर त्यांच्या स्थापने मागील मुख्य उद्देश पूर्ण झाल्याने म्हणा किंवा स्पर्धक निर्माण झाल्याने डबघाईला येवू लागली. तरीही काँग्रेस पक्षाने वेळोवेळी ह्या कंपनीला पैसे देवून सदर वृत्तपत्रे प्रकाशित करणे सुरूच ठेवले होते. काँग्रेसने कर्जाऊ म्हणून दिलेली ही रक्कम ९० कोटी झाली व, २००८ सालामध्ये ही वृत्तपत्रे प्रकाशित होणे ठप्प झाले.

म्हणून सोनिया गांधी, राहुल गांधी व, दिवंगत काँग्रेस नेते मोतीलाल व्होरा यांनी १९५६ सालच्या सुधारीत कंपनी कायद्याच्या कलम २५ यानुसार 'यंग इंडिया' नामक एक दुसरी कंपनी स्थापन करून ए्ह कंपनीवर असलेल्या ९० कोटी रुपयांच्या कर्जाच्या रकमेचे भागभांडवलामध्ये रूपांतर करून व तातडीच्या खर्चासाठी ह्या कंपनीला ५० लाख रुपये देऊन पुनरुज्जीवित केले होते.

१९५६ सालच्या कंपनी कायद्याच्या कलम २५ अनुसार (नंतर हाच कायदा २०१३ सालचा कायदा झाला व, कलम २५ याऐवजी कलम ८ झाले.) स्थापन झालेली ही 'यंग इंडिया' नावाची कंपनी ही ज्या कायद्यानुसार स्थापन झाली तो कायदाच मुळी ह्या कंपनीचे स्वरूप नॉट फॉर प्रॉफिट कंपनी आहे असे इथे सांगतो. म्हणजे, सदर कंपनीचे मालक सोनिया गांधी, राहुल गांधी व, इतरांना कोणत्याही स्वरूपाचा लाभ पैशांच्या स्वरूपात किंवा मालमत्तेच्या स्वरूपामध्ये ह्या कंपनीकडून घेता येत नाही. एवढेच नव्हे तर, ए्ह कंपनीच्या ज्या मालमत्ता आहेत त्याचे भाडेसुध्दा ह्या कंपनीच्या प्रवर्तकांना म्हणजे सोनिया गांधी, राहुल गांधी आणि, इतरांना घेता येणार नाही असे प्रावधान आहे. ह्या कंपनीला काही नफा झाला किंवा कुठूनतरी मालमत्तेचे भाडे आले तर, ते ह्या कंपनीच्या नियमानुसार त्या कंपनीच्या उद्देशांसाठीच खर्च करावे लागते एवढे हे स्वच्छ आणि स्पष्ट आहे. हे एवढे स्पष्ट असतानाही हे सरकार वड्याचे तेल वांग्याचे काढत आहे. तुमच्या पूर्वजांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला नाही म्हणून तुम्ही त्या स्वातंत्र्यलढ्यालाच बदनाम करीत आहात हा नेमका कुठल्या प्रकारचा न्याय आहे? जिथे काँग्रेस पक्ष आणि, काँग्रेस पक्षाचे नेते त्या लुटारू गोऱ्या ब्रिटिशांना घाबरले नाहीत तिथे अशा खोट्याचे-असत्याचे मजले बांधणाऱ्या चोरांना का व नक्की कशासाठी घाबरतील?

कुकडी नदीकाठच्या शेतकऱ्यांना नारायणगाव पोलिसांकडून दिलासा जप्त केलेल्या केबल शेतकऱ्यांना परत करणार महादेव शेलार

जुन्नर ■ सचिन थोरवे



जुन्नर नारायणगाव : नारायणगाव , बोरी साळवाडी, मांजरवाडी परिसरातून शेतकऱ्यांच्या नदीतून पाण्याच्या मोटरच्या केबल चोरी करणाऱ्या सात आरोपींना नारायणगाव पोलीसांनी ठोकल्या बेड्या ... केबलचे बंडल, एक महिंद्रा पिकअप व दोन मोटरसायकल सह ६ लाख ७० हजार ४००/- रुपयांचा मद्देमाल हस्तगत करत चार गुन्हे उघडकीस आणण्यात नारायणगाव पोलीसांना यश मागील काही दिवसापासून नारायणगाव, बोरी साळवाडी , मांजरवाडी तसेच आजूबाजूच्या परिसरात पाण्याच्या मोटारच्या केबल चोरीच्या घटना वाढल्या होत्या त्या अनुषंगाने पुणे ग्रामीण जिल्ह्याचे माननीय पोलीस अधीक्षक श्री पंकज देशमुख साहेब यांनी सदर गुन्ह्यांना प्रतिबंध करून गुन्ह्यांची तात्काळ उकल करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. नारायणगाव पोलीस स्टेशन हद्दीत गणपत बबन बांगर वय ६६ वर्षे, व्यवसाय शेती, रा. बोरी खु, साळवाडी ता. जुन्नर जि. पुणे यांच्या तसेच इतर २० ते २५ शेतकऱ्यांच्या नदीतील पाण्याच्या मोटरच्या केबल चोरीच्या गेल्याच्या घटना घडल्या होत्या सदर चोरीच्या घटनेच्या अनुषंगाने नारायणगाव पोलीस स्टेशन येथे पुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने नारायणगाव पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री महादेव शेलार यांनी पोलीस उपनिरीक्षक सोमशेखर शेटे, पोलीस उपनिरीक्षक जगदेव पाटील, पोलीस उपनिरीक्षक विनायक दडस पाटील, पोलीस हवालदार पोपट मोहरे, पोलीस हवालदार दत्ता तळपाडे ,पोलीस हवालदार आदिनाथ लोखंडे, महिला पोलीस हवालदार तनुश्री घोडे, पोलीस शिपाई सत्यम केळकर, पोलीस शिपाई गोरक्ष हासे, पोलीस शिपाई सुभाष थोरात, पोलीस शिपाई सोमनाथ डोके, पोलीस शिपाई बनकर, पोलीस शिपाई टीलेश जाधव, ट्रॅफिक वॉर्डन सोनवणे यांची टीम तयार करून गोपनीय माहितीच्या आधारे संशइत इसम नामे १) अमोल रामदास मेंगळे वय २० वर्षे राहणार वराळे तालुका खेड जिल्हा पुणे २) बाळू रामनाथ हिंदोळे वय २८ वर्ष राहणार अंबड मुक्ताईवाडी तालुका अकोले जिल्हा अहिल्यानगर ३) आकाश प्रकाश जाधव वय २० वर्षे राहणार महाळुंगे पडवळ तालुका आंबेगाव जिल्हा पुणे ४) शरद रमेश गांडाळ वय २४ वर्षे राहणार सावरचोळ तालुका अकोले जिल्हा अहिल्यानगर ५) अविनाश मंगेश काळे, वय २३ वर्ष ६) मनोहर रामचंद्र गावडे वय ४२ वर्ष ७) शैलेश बाळू पारधी वय २५ वर्ष तिघे राहणार महाळुंगे पडवळ तालुका आंबेगाव जिल्हा पुणे यांना दिनांक १५/०४/२०२५ रोजी ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चोरी केलेल्या केबलचे बंडल, एक महिंद्रा पिकअप व दोन मोटरसायकल सह एकूण ६ लाख ७० हजार ४००/- रुपयांचा मद्देमाल हस्तगत करत चार गुन्हे उघडकीस आणण्यात नारायणगाव पोलिसांना यश आले आहे.

सदर आरोपींना माननीय प्रथम वर्ग न्यायालय जुन्नर येथे हजर केले असता त्यांना दोन दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजूर करण्यात आली असून सदर गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस हवालदार पोपट मोहरे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी पुणे ग्रामीण जिल्ह्याचे माननीय पोलीस अधीक्षक श्री पंकज देशमुख सो, माननीय अप्पर पोलीस अधीक्षक श्री रमेश चोपडे सो, माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी , जुन्नर विभाग जुन्नर श्री रविंद्र चौधरी सो, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा पुणे ग्रामीण चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अविनाश शिळीमकर सो यांच्या मार्गदर्शनाखाली नारायणगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री महादेव शेलार, पोलीस उपनिरीक्षक सोमशेखर शेटे, पोलीस उपनिरीक्षक जगदेव पाटील, पोलीस उपनिरीक्षक विनायक दडस पाटील, पोलीस हवालदार पोपट मोहरे, पोलीस हवालदार दत्ता तळपाडे , पोलीस हवालदार आदिनाथ लोखंडे, पोलीस हवालदार संतोष कोकणे, महिला पोलीस हवालदार तनुश्री घोडे, सोनाली गडगे, पोलीस शिपाई सत्यम केळकर, पोलीस शिपाई गोरक्ष हासे, पोलीस शिपाई सुभाष थोरात, पोलीस शिपाई सोमनाथ डोके, पोलीस शिपाई बनकर, पोलीस शिपाई टीलेश जाधव , ट्रॅफिक वॉर्डन सोनवणे, महिला पोलीस शिपाई सोनाली रगतवान, शुभांगी दरवडे, पूनम गारगोटे, पूजा शहा, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार दिनेश साबळे, पोलीस नाईक संदीप वारे, पोलीस शिपाई अक्षय नवले यांचे पथकाने केले आहे.

आर्वी विधानसभा क्षेत्रातील चार गावांचा बोर व्याघ्र प्रकल्पात समावेश, पुनर्वसनास कॅम्पा निधीस मान्यता : आमदार सुमितदादा वानखेडे

मुंबई ■ प्रतिनिधी

शासन दरबारी आमदार सुमित वानखेडेंचे वजन झाले पुन्हा सिद्ध
आमदार सुमित वानखेडेंनी वर्षोनुवर्षे पुनर्वसनाचा रखडलेला प्रश्न लावला मार्गी



मुंबई : मंत्रालय येथे पार पडलेल्या २४ व्या राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत आर्वी विधानसभा क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. कारंजा तालुक्यातील एनीदोडका, मेटहीरजी, उमरविहिरी, मरकसुर आणि सेलू तालुक्यातील गरमसुर ही पाच गावे बोर व्याघ्र प्रकल्पात समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे आर्वी विधानसभा क्षेत्राचे विद्यमान आमदार सुमित वानखेडे यांनी केलेल्या प्रयत्नांना यश मिळाले आहे.

हि पाच गावे बोर व्याघ्र प्रकल्पा लगत असल्याने येथे पट्टेदार वाघाचा दिवसाढवळ्या मुक्त संचार होता. त्यामुळे या गावातील नागरीकांना, शेतकऱ्यांना जिव मुठीत घेऊन शेत शिवारातील कामे करावी लागत होती. अनेकांचा वाघाच्या दुर्दैवी हल्ल्यात प्रसंगी प्राणही गेला होता. या गावाचे पुनर्वसन व्हावे म्हणून लोकप्रतिनिधींनी प्रयत्न केले होते. परंतु त्यांना यश मिळाले नव्हते. आमदार सुमित वानखेडे यांनी या गावालगत व्याघ्र प्रकल्प असल्याने या गावांचे पुनर्वसन व्हावे म्हणून योग्य तांत्रिक पाठपुरावा केला. शासनदरबारी वानखेडेंच्या प्रयत्नांना यश मिळाले.

या बाबतीत अधिक माहिती देतांना आमदार सुमित वानखेडे यांनी सांगितले की, या गावांचे पुनर्वसन कॅम्पा निधीतून करण्यात येणार असून यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यास देखील वन्यजीव मंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून रखडलेला बोर व्याघ्र प्रकल्पातील गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागणार असून, पर्यावरणीय संवर्धनासोबतच या गावातील नागरिकांच्या सुरक्षित आणि उज्ज्वल भवितव्यास चालना मिळणार आहे असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या ऐतिहासिक निर्णयाबद्दल महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे वनमंत्री गणेश नाईक आणि वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांचे आमदार सुमित वानखेडे यांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत.

या बैठकीस राज्यमंत्री श्री. आशिष जयस्वाल, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, तसेच प्रवीण परदेशी, मिलिंद म्हैसकर, श्रीकर परदेशी आणि वन्यजीव मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

'नांदपूर-लाडेगाव रस्त्यादरम्यान येत असलेल्या पुलाचे बांधकाम तात्काळ सुरू करा' अरविंद लिल्लोरे यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

आर्वी ■ प्रतिनिधी



आर्वी : वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यात येत असलेल्या नांदपूर-लाडेगाव रस्त्यादरम्यान येत असलेल्या पुलाची अवस्था अतिशय वाईट आहे. केव्हाही कुठलीही अप्रिय घटना घडू शकते. विशेषतः पावसाळ्यात सायकल ने येणे-जाणे करणार्या विद्यार्थ्यांना व शेतकर्यांना भयंकर त्रास सहन करावा लागतो. भविष्यात संभाव्य दुर्घटना टाळण्याकरीता, या पुलाचे बांधकाम तात्काळ सुरू करने फार आवश्यक आहे.

पुलाचे बांधकाम तात्काळ सुरू करण्याकरिता माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवश्यक ते निर्देश संबंधितांना द्यावे. अशा आशयाचे निवेदन आर्वी तालुक्यातील ग्राम नांदपूर येथील नागरीक अरविंद लिल्लोरे यांनी उपविभागीय अधिकारी आर्वी, विश्वास सिरसाट यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आज दिनांक एप्रिल १७ ला दिले.

पुलाचे बांधकाम तात्काळ सुरू करून पावसाळा सुरू होण्यापूर्वी पुर्ण करावे, असे देखील निवेदनात म्हटले आहे.

सविस्तर वृत्त असे की, गेल्या दोन वर्षांपुर्वी नांदपूर-लाडेगाव रस्त्याचे डांबरीकरण झाले, परंतु रस्त्यादरम्यान येत असलेल्या पुलाचे बांधकाम मात्र करण्यात आले नाही. त्यामुळे रस्त्याचे डांबरीकरण होऊन सुद्धा, पुलावरून जाताना लोकांना त्रास सहन करावा लागतो. शेत मालाने भरलेली बैलगाडी असो किंवा मालवाहू गाडी, कमालीची जीव घेणारी कसरत, या पुलावर लोकांना अनुभवायला किंवा पाहायला मिळते. पावसाळ्यात या खचलेल्या पुलावरून पाणी वाहते व रस्त्याची वाहतूक बंद पडते.

'सरकारने ग्रामीण भागातील समस्या समजून घेणे फार गरजेचे आहे. स्वातंत्र्याच्या पंचाहत्तर वर्षानंतर सुद्धा ग्रामीण भागातील लोकं चांगल्या रस्त्यांपासून वंचित आहे. सरकारने ग्रामीण भागातील रस्त्यांकरिता विशेष मोहीम राबवायला हवी,' अशा प्रकारच्या भावना अरविंद लिल्लोरे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केल्या.

शाळा व शिक्षणासंबंधी अडचणी शासन दरबारी मांडणार. मा. चंदुरे मॅडम विस्तार अधिकारी रहिमतपूर !

कोरेगाव ■ मेहमुद्दीन शेख



कोरेगावः उर्दू शाळा रहिमतपूर शाळेतील (घ्ळे)२०२५. स्पर्धा परीक्षेमध्ये मध्ये यश संपादन केलेल्या बक्षीस संभारंभ व निपुण महाराष्ट्र अंतर्गत पालक जबाबदारी कार्यक्रमात त्या बोलत होत्या या कार्यक्रमात उर्दू स्कूल च्या मुख्याध्यापिका भालदार मॅडम यांनी प्रस्तावित करताना म्हणाल्या या शाळेला जे यश प्राप्त झाले आहे त्याचे योगदान सर्व शिक्षिका व पालक यांच्याकडे जाते असेच पालकांनी शाळेच्या प्रत्येक कार्यक्रमात सहभागी व्हावे व्यवस्थापन समितीचे सदस्य मेहमूद्दीन शेख उर्फ बबलू भाई म्हणाले मी शाळेतील मुलांना सर्व शासकीय योजना द्याव्यात व या शाळेला एक चांगली इमारत मिळावी कारण ही इमारत फार जुनी आहे व धोकादायक आहे तरी या इमारतीला नवीन बांधकामासाठी परवानगी मिळावी यासाठी सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावे त अशी विनंती केली मुस्लिम समाजाच्या विविध मान्यवरांनी व सदस्यांनी भरघोस असे बक्षीस यशस्वी विद्यार्थ्यांना देऊन त्यांना प्रोत्साहन दिले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डांगे मॅडम मुल्ला मॅडम भालदार मॅडम व व्यवस्थापन समिती यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाला सर्व मुस्लिम समाजाचे पालक व मराठी शाळा नंबर १ च्या मुख्याध्यापिका गुरव मॅडम उपस्थित होत्या

सावळी सदोबा परिसरात पाणीटंचाईचं भीषण संकट - प्रशासनाचं दुर्लक्ष नागरिकांसाठी जीवघेणं

आर्णी ■ धनराज पवार



आर्णी तालुक्यातील सावळी सदोबा ग्रामीण परिसरातील नागरिकांना पाणीटंचाई समस्या सारख्या भीषण समस्यांचा सामना करावा लागत आहे, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर होत चालला आहे.या ग्रामीण भागातील सुधाकरनगर,पाळोदी सावळी सदोबा,निळेगाव,सुभाष नगर,नागरिकांना प्रचंड पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, शासनाच्या नियोजनाच्या अभावामुळे ही परिस्थिती बळावत आहे.एकीकडे शासन 'जनजीवन मिशन'सारख्या योजनांवर कोट्यवधी रुपयांचा खर्च करत असल्याचा दावा करतो, तर दुसरीकडे या योजना केवळ कागदांपुरत्याच मर्यादित राहत असल्याची वस्तुस्थिती आहे.अनेक गावांमध्ये पाणीपुरवठ्याची सुविधा असूनही नियोजनशून्यता आणि देखरेखीच्या अभावामुळे नागरिकांना टँकरवर अवलंबून राहावं लागतं.काही गावांमध्ये ग्रामपंचायतींनी खासगी विहिरी अधिग्रहित केल्या आहेत, परंतु त्यावर नियंत्रण नसल्यानं वेळेवर पाणी सोडलं जात नाही.परिणामी, त्या विहिरीचा फायदा पुन्हा मूळ मालकालाच होतो आणि सामान्य नागरिक उपेक्षित राहतो.याशिवाय, सर्वात चिंताजनक बाब म्हणजे बहुतांश ग्रामसेवक मुख्यालयातच राहत नाहीत. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कामकाजावर कोणतेही नियंत्रण राहिलेले नाही. प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे पाणीटंचाईचा प्रश्न अधिकच भयावह होत आहे. उष्णतेमुळे भूजल पातळी खालावली, विहिरी आटल्या आहे, या परिसरातील बहुतांश विहिरी, बोरवेल्स आटल्या आहेत. शेतातील पाण्याचे स्रोत कोरडे पडल्यामुळे शेतकरी आणि सामान्य नागरिक दोघेही अडचणीत आले आहेत.

सार्वजनिक पाणीपुरवठा करणाऱ्या नळ योजना शासनाच्या वतीने राबवण्यात येतात. मात्र या योजनांची अंमलबजावणी केवळ कागदांपुरती मर्यादित असून, भ्रष्टाचाराची कुजबूजही सुरू आहे. कोट्यवधींचा निधी खर्च होऊनही पाणीटंचाई कायम असल्याचं चित्र समोर येत आहे.या पार्श्वभूमीवर सावळी सदोबा सर्कलमधील नागरिकांनी जिल्हाधिकारी साहेबांकडे मागणी केली आहे की, त्यांनी स्वतः या भागाचा आढावा घ्यावा. प्रत्येक ग्रामसेवकाची जबाबदारी ठरवून देत पाणीप्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी ठोस निर्णय घ्यावेत.पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत गरजेसाठी संघर्ष करावा लागत असेल, तर विकासाच्या गप्पा या फक्त दिशाभूल करणाऱ्या ठरतात. शासनाने आणि प्रशासनाने त्वरित लक्ष देऊन या भागातील नागरिकांना दिलासा द्यावा, हीच या गावकऱ्यांची कळकळीची मागणी आहे.

याज्ञवल्क्य श्रीकांत जिचकार स्वगृही परतल; काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश

काटोल ■ प्रशांत पवार



काटोल/प्रशांत पवार

काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री स्व. डॉ. श्रीकांत जिचकार यांचे सुपुत्र याज्ञवल्क्य जिचकार यांनी आज काँग्रेस पक्षात पुन्हा प्रवेश केला. निवडणुकीच्या काळात त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती, ती मागे घेऊन त्यांना काँग्रेस पक्षात प्रवेश देण्यात आला.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्यालय टिळक भवन येथे एका कार्यक्रमात काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या हस्ते व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम पार पडला. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी त्यांचे काँग्रेस परिवारत स्वागत करुन शुभेच्छा दिल्या.

'आपण काँग्रेस विचाराशी पाईक असून काँग्रेसची विचारधारा तरुण वर्गात रुजवण्यालाठी काम करत आहे. काँग्रेस पक्षात तरुणांचा नेतृत्वाची संधी दिली जाते आणि काँग्रेसचा विचारच देशाला तारणारा आहे. मला काँग्रेस पक्षात पुन्हा प्रवेश दिल्याबद्दल रमेश चेन्नीथला, हर्षवर्धन सपकाळ व सर्व वरिष्ठ नेत्यांचा आभार मानतो व त्यांच्या मार्दर्शनाखाली काम करेन असे', याज्ञवल्क्य जिचकार यांनी यावेळी म्हटले.

याज्ञवल्क्य हे ज्ञानयोगी डॉक्टर श्रीकांत जिचकार यांचे सुपुत्र असून त्यांनी विधानसभा निवडणुकीत नागपूर जिल्ह्यातील काटोल मतदारसंघातून अपक्ष निवडणूक लढवली होती. काटोल हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचा मतदारसंघ होता. यंदाच्या निवडणुकीत तेथून अनिल देशमुख यांचे सुपुत्र सलील देशमुख यांनी राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक लढवली होती. याज्ञवल्क्य श्रीकांत जिचकार महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस आहेत. त्यांनी काटोल व भारतभर युवकांना रोजगाराशी जोडण्याचे काम केले आहे.

यावेळी काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार, विधान परिषद गटनेते सतेज उर्फ बंटी पाटील, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, आमदार नाना पटोले, खा. डॉक्टर कल्याणराव काळे, खा. रवींद्र चव्हाण, खा. रजनी पाटील, खा. डॉ. शोभाताई बच्छाव, खा. प्रणिती शिंदे, खा. प्रतिभा धानोरकर, खा. चंद्रकांत हांडोरे, खा. शामकुमार बर्वे, खा. बळवंत वानखडे, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, यशोमती ठाकूर, नसीम खान विश्वजीत कदम, मा. खा. हुसेन दलवाई, आमदार अमीन पटेल, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत याज्ञवल्क्य श्रीकांत जिचकार स्वगृही परतले.

शिव राज्याभिषेक दिनानिमित्त राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन महाराष्ट्रातील ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या गावी करणारः- माजी आ. बच्चु कडू

मुंबई ■ दिलीप येवले



मुंबई : महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियन एनजिपी ४५११ १७ एप्रिल २०२५ रोजी राज्याध्यक्ष बच्चु कडू यांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित झाली या सभेला प्रामुख्याने उपस्थित कार्याध्यक्ष काजी अल्लाउद्दीनजी, उपाध्यक्ष दिलीप डिके, उपाध्यक्ष दत्ताभाऊ भोईर प्रामुख्याने उपस्थित होते आजच्या या बैठकीचे नियोजन राज्य कोषाध्यक्ष विकास भोईर यांनी लोकमान्य टिळक सभागृह पहिला मजला मराठी पत्रकार संघ आजाद मैदान जवळ मुंबई येथे केले बैठकीला राज्यातील एकूण २७ जिल्ह्याची उपस्थिती होती. आजच्या सभेत ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मागण्या संदर्भात राज्याध्यक्ष बच्चु कडू यांच्या नेतृत्वात ६ जून २०२५ रोजी शिव राज्याभिषेक दिनानिमित्त राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन महाराष्ट्रातील ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या गावी करणारः असल्याचा निर्णय आजच्या सभेत घेण्यात आला. आणि २ विषयानुसार खालील प्रमाणे संतोष शिंदे यांची मराठवाडा विभागीय अध्यक्षपदी तर अंकुश शिंदे यांची मराठवाडा विभागिय सचिव पदी निवड तर अजय जाधव यांची कोकण विभागीय अध्यक्षपदी व अभय सावंत यांची विभागीय सचिव पदी निवड, जावेद खान यांची अमरावती विभागीय सचिव पदी निवड

वरील प्रमाणे निवड आजच्या सभेत करण्यात आली सभेला प्रामुख्याने राज्य संघटक सतीश पाटील, नागपूर विभागीय अध्यक्ष जयदेव आंबुलकर, विभागीय सचिव महेश्वरी फंडे, गडचिरोली जिल्हाध्यक्ष मारुती पुल्लीवारजी व इतर सर्व जिल्हा पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242